कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६

किंमत ४ ₹

## अनोळखी महिलेची आत्महत्या

**रायगड :** अलिबाग समुद्र किनारी एका महिलेचा मृतदेह आढळून आला. ही घटना बुधवारी (दि.२२) सायंकाळी घडली. लिहून ठेवलेल्या एका चिठ्ठीवरून तिने आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला असून पी.जी.पाटील अशी सही त्या चिठ्ठीत असल्याचे सांगण्यात आले आहे. या मृत महिलेची अद्याप ओळख पटलेली नाही. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया रात्री उशीरापर्यंत सुरु होती. मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग समुद्रकिनारी एक महिला बेशुध्द अवस्थेत पान २ वर

HIRING ALERT
Looking For 2 waiters, 2 house boy
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

## वेधक

### शाह सरकारविरोधात जनआक्रोश

**नेपाळ :** जेन झी आंदोलनानंतर नेपाळमध्ये झालेल्या निवडणुकीतून सत्तेवर आलेल्या बालेन शाह यांच्या नेतृत्वाखालील सरकारने धडाकेबाज निर्णय घेण्यास सुरुवात केली होती. शाह यांच्या सत्ता स्थापनेला महिना लोटत नाही तोच त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारविरोधात आंदोलनांना सुरुवात झाली आहे. राजधानी काठमांडूपासून सत्तेचं केंद्र असलेल्या सिंहदराबारपर्यंत विरोधाचे आवाज उमटू लागले आहेत. हजारो शालेय विद्यार्थी शाळेच्या गणवेशातच आंदोलन करण्यासाठी रस्त्यावर उतरले. सरकार संवादापेक्षा दडपशाही भूमिका अवलंबत आहे. विद्यार्थी संघटनांना महत्त्व देत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. पान २ वर

### पाचव्या मजल्याचा स्लॅब कोसळला

**नवी मुंबई:** नेरुळ सेक्टर १६ए परिसरातील वुडलँड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी (प्लॉट क्र. ६३) येथे मंगळवारी (दि.२१) सायंकाळी पाचव्या मजल्यावरील स्लॅबचा संपूर्ण भाग कोसळून चौथ्या मजल्यावरील हॉलमध्ये पडल्याची गंभीर घटना घडली. या दुर्घटनेमुळे इमारतीला मोठे भगदाड पडले असून परिसरात एकच खळबळ उडाली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी काही क्षणांच्या फरकाने मोठा अनर्थ टळल्याचे समोर आले आहे. ज्या घरात स्लॅब कोसळला, त्यावेळी घरातील व्यक्ती किचनमध्ये असल्याने त्यांचा जीव वाचला.

### राज्यात तीन दिवस वादळाचा प्रभाव

**मुंबई :** राज्यात सध्या पश्चिमी वादळाची स्थिती असून बहुतांश जिल्ह्यात वादळी वाऱ्यांसह पावसाची तर काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि गारपीटीची नोंद होत आहे. तर राज्यातील काही भागात उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती आहे. यामुळे कमाल तापमानात लक्षणीय वाढ नोंदली जात आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील तीन दिवस राज्यातील काही भागात पावसाची शक्यता वर्तविली असून या भागांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. राज्यात सध्या काही भागात पाऊस तर काही भागात तीव्र उष्णतेचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात आणि एप्रिलच्या सुरवातीच्या दिवसात राज्यातील काही भागात पावसाची नोंद झाली होती. त्यानंतर पुन्हा उष्मा पान २ वर

### लालपरीला मिळणार नवं ग्लॅमर!

**मुंबई :** महाराष्ट्राची लालपरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाला आता नव्या चेहऱ्यांची साथ मिळणार आहे. मराठमोळा अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांची एसटी महामंडळाच्या ब्रॅण्ड ॲम्बेसिटर म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रवाशांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यासाठी आकर्षित करण्यासाठी आणि एसटीची प्रतिमा अधिक आधुनिक व आकर्षक करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक येत्या दोन दिवसांत रितेश आणि जिनिलिया यांच्यासोबत अधिकृत करार करणार असल्याची माहिती समोर आली पान २ वर

# निवडणूक परराज्यात फटका कोकणात

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी आलेले पश्चिम बंगालमधील कामगार निवडणुकीसाठी गावी गेले आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गासह रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील इतर बांधकामांची गती मंदावली आहे. कामगार नाही तर मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग वेळेत कसा पूर्ण होणार, असा प्रश्नही आता उपस्थित केला जात आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम मे महिन्यात पूर्ण होईल, अशी ग्वाही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे; मात्र प्रत्यक्षात कामाची गती पाहता हे काम पावसाळा संपेपर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात महामार्गावरील काही उड्डाणपूल आणि रस्त्याचे काम शिल्लक आहे. या कामाचा ठेका घेतलेली एजन्सी ही परराज्यातील आहे आणि कामगारही परराज्यातील आहेत. यातील बहुतांशी कामगार हे पश्चिम बंगालमधील आहेत.




**बहुतांशी कामगार पश्चिम बंगालचे**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामात वाहनांवर काम करणारे चालक तसेच सेंट्रिंगचे काम करणारे बहुतांशी कामगार हे पश्चिम बंगालमधील आहेत. ते निवडणुकीसाठी गावी गेल्यामुळे महामार्गाच्या कामावर थोडा परिणाम झाला आहे. आठवड्यानंतर कामगार पुन्हा येतील आणि कामाला पुन्हा गती मिळेल, असे ठेकेदार कंपनीचे म्हणणे आहे.

शहर आणि ग्रामीण भागात बिल्डरकडून इमारती उभारल्या जात आहेत. या इमारतीच्या सेंट्रिंग, गवंडी काम आणि प्लास्टरच्या कामासाठी पश्चिम बंगालमधील कामगार मोठ्या प्रमाणावर काम करतात. कामाचा दर्जा आणि स्थानिकांपेक्षा कमी पगारात हे कामगार काम करतात त्यामुळे बिल्डर आणि ठेकेदार बंगालमधील कामगारांना प्राधान्य देतात, पश्चिम बंगालमध्ये त्यांची मतदार यादीत नावे आहेत. सध्या पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकीत मतदान केले नाही तर पुढच्या निवडणुकीत मतदार यादीतून नाव वगळले जाईल, मतदान ओळखपत्र रद्द होईल, अशी भीती बंगाली कामगारांमध्ये आहे. त्यामुळे हे कामगार पश्चिम बंगालला गेले आहेत. त्याचा फटका येथील बांधकामांना बसाला आहे.

**निकालानंतरच मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला होणार सुरुवात**

# मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण होण्यापूर्वीच टोल वसुली होणार!

## केंद्र सरकारकडून टेंडर काढून ठेकेदार निश्चितीची तयारी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मुंबई -गोवा महामार्ग चौपदरीकरण पूर्णत्वास जात असताना ओसरगाव टोल नाक्यावरून लवकरच पथकर वसुली सुरू होणार आहे. या टोल नाक्यासाठी केंद्र शासनाने निविदा मागविल्या आहेत. येत्या २४ तारखेला या निविदा उघडल्या जाणार असून, ठेकेदार निश्चित केला जाणार आहे, तर मेपासून टोल वसुली सुरू होण्याची शक्यता आहे.

ओसरगाव टोल नाक्यावरून टोल वसुलीसाठी यापूर्वी तीन एजन्सी नियुक्त झाल्या होत्या; मात्र या एजन्सीकडून टोल वसुली सुरू होताच टोलविरोधी कृती समिती आणि राजकीय पक्षांनी जोरदार आंदोलने सुरू केली. त्यामुळे ओसरगाव टोल नाक्यावरील टोल वसुली बंद केली आहे. यापूर्वी १४ जून २०२३ ला पान २ वर

महामार्ग चौपदरीकरणाचे काम मे २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन महामार्ग विभागाने केले आहे. दुसरीकडे मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून महामार्गावरील सर्व टोल नाके सुरू करण्याचीही कार्यवाही महामार्ग विभागाकडून सुरू केली आहे. यात ओसरगाव हा टोल नाका सर्वप्रथम सुरू करण्याचे नियोजन महामार्ग विभागाने केले आहे. महामार्ग विभागाने जाहीर केलेल्या निविदांमध्ये स्थानिक वाहनांना टोल करातून वगळण्याबाबत कोणताही उल्लेख नाही.

२३ एप्रिलला ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आहे, तर २४ एप्रिलला नवी दिल्ली येथील महामार्ग विभागाच्या कार्यालयात निविदा उघडल्या जाणार असून त्याच दिवशी ठेकेदार निश्चित होणार आहे.



# मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर दोन दिवसांचा ट्रॅफिक मेगाब्लॉक

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे वर गुरुवारी (दि.२३), शुक्रवारी (दि.२४) दुपारी १२ ते ३ या वेळेत ३ तासांचा मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या वेळेत पुलाच्या कामासाठी वाहतूक पूर्णपणे बंद राहील, अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिली. २३ एप्रिलला मुंबईकडे जाणारी तर २४ एप्रिलला पुण्याकडे जाणारी वाहतूक ३ तासांसाठी बंद राहील. या कालावधीत वाहने जुन्या महामार्गावरून वळवली जातील. प्रवाशांनी गैरसोय टाळण्यासाठी वेळेचं नियोजन करूनच बाहेर पडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



डोंगरगाव/कुसगाव (कि.मी. ५८/५००) येथील पुलावर दुरुस्ती व रंगकामाची कामे केली जाणार असल्यानं दोन दिवस काही वेळासाठी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, २३ एप्रिल २०२६ रोजी म्हणजे गुरुवारी दुपारी १२ ते ३ या वेळेत मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहील. या वेळेत सर्व वाहने किवळे, देहूरोड आणि तळेगाव मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरून कुसगाव टोल प्लाझामार्गे मुंबईकडे वळवण्यात येणार आहेत.

**हे असणार पर्यायी मार्ग**

२४ एप्रिल २०२६ रोजी म्हणजे शुक्रवारी दुपारी १२ ते ३ या वेळेत पुण्याकडे जाणारी वाहतूक बंद राहणार आहे. या काळात वाहन कुसगाव टोल प्लाझामार्गे राष्ट्रीय महामार्ग ४८ वरून देहूरोड व किवळे मार्गे पुण्याकडे वळवली जातील. या ब्लॉकमुळे त्या वेळेत प्रवास करणाऱ्यांना थोडा त्रास होऊ शकतो. त्यामुळे वाहनचालकांनी आपला प्रवास आधीच नियोजित करावा आणि शक्य पान २ वर

# पाणी टंचाईच्या झळा तीव्र

## आठ तालुक्यातील ४५ हजार नागरिक तहानलेले

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील अलिबागसह आठ तालुक्यातील ३१ गावे आणि १३१ वाड्यांमधील ४५ हजार नागरिक तहानलेले असून पाण्यासाठी त्यांना वणवण करावी लागत आहे. धरणांमधील जलसाठा कमी झाल्याने या गावांमध्ये टँकरमार्फत पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे पाणी टंचाईच्या झळा तीव्र झाल्याचे चित्र दिसून येत आहे. जलजीवनच्या शेकडो योजना अपूर्ण राहिल्याने पाण्यासाठी दोन-तीन किलोमीटर पायपीट करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची साधारणतः लोकसंख्या १६ लाख ६४ हजार आहे. दोन हजारहून अधिक गावे, वाड्यांचा समावेश आहे. या गावांमध्ये प्रति माणसी ५५ लिटर पाण्यासाठी जलजीवनची योजना राबविण्यात आली. एकाच ठेकेदाराकडे पाच ते दहा योजनांची कामे देण्यात आली. मात्र नियोजनाच्या अभावामुळे जलजीवनचे काम अपूर्ण स्थितीत राहिले. घरासमोर नवीन नळ कनेक्शन बसविण्यात आले. नागरिक सुखावून गेले होते. महिला ही आनंदी झाल्या होत्या. डोक्यावरील हंडा उतरणार अशी अपेक्षा होती. परंतू आशा पूर्णतः खोटी ठरली. ही योजनाही फेल ठरल्याची प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहे. करोडो रुपये खर्च करून गावागावात दोन वर्षापुर्वी जलजीवनची योजना सुरु करण्यात आली. मात्र आजही शेकडो योजनांची कामे प्रलंबित आहेत. पाईप बसविण्यात आले आहेत, तर पाण्याची टाकी नाही. योजनांची कामे पूर्ण आहेत, तर नळाला पाणी नाही, अशी अवस्था निर्माण झाली आहे.

धरणांमधील साठा दिवसेंदिवस कमी होत आहे. पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. पावसाळा सुरु होईपर्यंत धरणांमध्ये पाणी शिल्लक राहवे, यासाठी अनेक गावांमध्ये दोन ते तीन दिवस आड पाणी पुरवठा केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रचंड हाल पान २ वर



**शासकीय टँकर गायब**

**रायगड जिल्ह्यामध्ये पूर्वी शासकीय टँकर उपलब्ध होते. या शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. मात्र गेल्या काही वर्षापासून शासकीय टँकरची जागा खासगी टँकरने घेतली आहे. या खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यावर भर दिला जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय टँकर गायब झाले आहेत. मात्र त्या जागी नवीन टँकर आणण्यास ही यंत्रणा उदासीन ठरली असल्याचे दिसून येत आहे.**

# पळसदरी तलावात तरुणाचा बुडून मृत्यू



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जतजवळील पळसदरी येथे सहलीसाठी आलेल्या १८ वर्षीय तरुणाचा पळसदरी तलावात बुडून मृत्यू झाला. मंगळवारी (दि.२१) दुपारी पळसदरी रेल्वे तलावाच्या पाण्यात बुडालेल्या तरुणाचा मृतदेह बुधवारी (दि.२२)सकाळी हेल्प फाऊंडेशनच्या रेस्क्यू टीमला सापडला.

नवी मुंबई येथील घणसोली भागात राहणार आर्यन थापर हा भारतीय विद्यापीठात बीबीए प्रथम वर्षाचा विद्यार्थी होता. कॉलेजच्या सोशल प्रोजेक्टनिमित्त तो सुमारे ७० ते ७५ विद्यार्थ्यांसोबत पळसदरी येथे आला होता. कार्यक्रम आटोपल्यानंतर आर्यन आपल्या मित्रांसह तलाव परिसरात गेला. आर्यनला पोहता येत असल्याने तो पाण्यात उतरला. दोन वेळा पोहत जाऊन तो सुरक्षित परतही आला. मात्र, तिसऱ्यांदा पाण्यात उतरल्यानंतर तो अचानक खोल पाण्यात बुडाला. मित्रांनी तात्काळ आरडाओरड करत मदतीसाठी धावपळ केली, मात्र त्याला वाचवण्यात अपयश आले. घटनेची माहिती पान २ वर

# प्रशिक्षणानंतरच शिक्षकांना मिळणार श्रेणी

## प्रशिक्षण नोंदणीसाठी २९ एप्रिलपर्यंत मुदत!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शिक्षकांना १२ वर्षे आणि २४ वर्षांच्या सेवेनंतर दिल्या जाणाऱ्या वरिष्ठ आणि निवडश्रेणीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, शिक्षकांना शुल्क भरून ऑनलाइन नोंदणीसाठी २९ एप्रिलपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे प्रभारी संचालक डॉ. नंदकुमार बेडसे यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शाळांतील शिक्षकांना १२ वर्षांच्या सेवेनंतर वरिष्ठ श्रेणी आणि २४ वर्षांच्या सेवेनंतर निवडश्रेणी दिली जाते. त्यानुसार वरिष्ठ श्रेणीसाठी ३० एप्रिलपर्यंत १२ वर्षांची, तर निवडश्रेणीसाठी ३० एप्रिलपर्यंत अर्हताकारी सेवा पूर्ण करणे अनिवार्य आहे.

तसेच काही शिक्षक, मुख्याध्यापक १ मे २०२६ ते ३० एप्रिल २०२७ या कालावधीत अर्हताकारी सेवा पूर्ण करून या कालावधीत निवृत्त होणार आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षक, मुख्याध्यापकांना वरिष्ठ, निवडश्रेणी प्रशिक्षणासाठी नोंदणी करता येणार आहे. जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेतर्फे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच कालावधीत प्रत्यक्ष स्वरुपात हे प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे.

**चार गटांसाठी प्रशिक्षण**

प्रशिक्षणासाठी प्राथमिक गट (पहिली ते चौथी, पहिली ते पाचवी, पहिली ते सातवी, पहिली ते आठवी, सहावी ते आठवी), माध्यमिक गट (नववी ते दहावी), उच्च माध्यमिक गट (अकरावी, बारावी), अध्यापक विद्यालय गट असे चार गट करण्यात आले आहेत. प्रशिक्षण वर्ग मराठीतून होणार आहे. वाचनसाहित्य मराठीव्यतिरिक्त इंग्रजी आणि उर्दू या भाषांमध्ये उपलब्ध करण्यात येणार आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

प्रशिक्षणाचा कालावधी स्वतंत्रपणे कळवला जाणार असल्याचे माहिती परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

नोंदणी केलेल्या शिक्षकांचे गटनिहाय प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी नावनोंदणी करताना शालार्थ आयडी वापरून नोंदणी करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षणार्थ्यांना नोंदणी करताना वापरलेल्या शालार्थ आयडीची पडताळणी करण्यात येणार आहे. पडताळणीमध्ये विभागाने संबंधितांना पात्र न केल्यास त्यांची नोंदणी रद्द केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# राजिपच्या अतिरिक्त सीईओ डॉ. सातपुते

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**



रायगड जिल्हा परिषद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अतिरिक्त जबाबदारी ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांच्याकडे होती. दीर्घ प्रतीक्षेनंतर रायगड जिल्हा परिषदेला पुर्णवेळ अतिरिक्त मुख्य कार्यकारी मिळाले आहेत. पालघरच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक डॉ. रुपाली सातपुते यांच्याकडे रायगड जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची धुरा सोपविण्यात आली पान २ वर


**छत्रपती शिवाजी महाराजांच्या आठवणींना उजाळा | रायगडावर दारूगोळा कोठारांचे जतन-संवर्धन सुरू**

# रायगडाचा वैभवशाली इतिहास उलगडणार

**। महाड । प्रतिनिधी ।**

स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडावरील ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन करण्याचे काम सुरू असून याअंतर्गत दारूगोळा कोठारांच्या जतन-संवर्धनाच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे. रायगड विकास प्राधिकरणामार्फत हे जतन-संवर्धनाचे काम सुरू असून गडाच्या वैभवशाली इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय पुन्हा उलगडण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

किल्ल्यावरील दारूगोळा कोठारे गडाच्या दक्षिण कड्याजवळ, वाघ दरवाजाच्या पूर्वेकडील उंच भागात आणि बारा टाक्यांच्या दक्षिणेस स्थित असून त्यांची रचना उत्तर-दक्षिण दिशेत करण्यात आलेली आहे. या दारूगोळा कोठारांची उंची, भिंतींची जाडी आणि बांधकाम पद्धती पाहता ती लष्करी दृष्टिकोनातून अत्यंत सक्षम आणि सुरक्षित रचना असल्याचे स्पष्ट होते. शिवकालीन काळात दारूगोळ्याच्या साठवणुकीसाठी अशा कोठारांना विशेष महत्त्व होते. प्राधिकरणामार्फत पहिल्या टप्प्यात या वास्तूंचे शास्त्रोक्त दस्तऐवजीकरण सुरू करण्यात आले आहे.



यात मोजमाप, नकाशे तयार करणे, छायाचित्रण व संरचनेचे तांत्रिक विश्लेषण यांचा समावेश आहे. प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजी राजे यांनी या दारूगोळा संवर्धन ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा आढावा घेतला. यावेळी रायगड प्राधिकरणचे अभियंता अविनाश बुर्ले उपस्थित होते. रायगडावरील जतन व संवर्धन यामुळे गडावरील दुर्लक्षित वास्तूंना नवसंजीवनी मिळत असून, गडाच्या ऐतिहासिक आणि स्थापत्य वारशाचे जतन अधिक प्रभावीपणे होणार आहे. यामुळे भविष्यात पर्यटक, संशोधक आणि इतिहास अभ्यासकांना रायगडाचा अभ्यास अधिक सखोलपणे करता येणार आहे. भिंतींवर वाढलेली झाडी-झुडपे केमिकल फवारणीद्वारे काळजीपूर्वक हटविण्यात आली असून, या प्रक्रियेदरम्यान कोठाराच्या दक्षिण भिंतीवर ब्रिटिशांनी पोटल्या डोंगरावरून केलेल्या तोफगोळ्यांच्या माराचे ठसे स्पष्टपणे आढळून आले आहेत. हे ठसे गडावरील युद्धकालीन हालचालींचे महत्त्वपूर्ण पुरावे मानले जात आहेत.

कोठाराच्या आतील भागातील माती, ढिगारे व इतर अवशेष हटविण्याचे काम सुरू असून मूळ बांधकामातील निखळलेले दगड काळजीपूर्वक क्रमांकित करण्यात येत आहेत.



# सांगोला पंचायत समितीत आमदार बाबासाहेब देशमुखांनी घेतली झाडाझडती

**। कोळा । वार्ताहर ।**

- **स्वच्छतेबाबत व्यक्त केली नाराजी**
- **तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश**

सांगोला पंचायत समितीमध्ये एका कार्यक्रमाप्रसंगी गेल्यानंतर आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना पंचायत समिती बचत भवन भवन परिसरात घाणीचे साम्राज्य दिसून आले. यावर तात्काळ त्यांनी अधिकाऱ्यांना फैलावर घेत झाडाझडती घेतली. पंचायत समिती नियोजित कार्यक्रमासाठी आ. डॉ. बाबासाहेब देशमुख गेले होते. आमदारांची गाडी आल्यानंतर त्या ठिकाणी गर्दीचा गराडा पडला. आ देशमुख सर्वांना भेटत असताना बचत भवनमध्ये स्थानापन्न होण्यासाठी गेले असता यावेळी पान २ वर

# आंबा, काजू उत्पादक संकटात

## नुकसानभरपाईसाठी आंबा उत्पादक संघाची शासनाकडे मागणी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**जागतिक हवामान बदलाचा फटका कोकणातील आंबा, काजू पिकांना मोठ्या प्रमाणात बसत आहे. जगप्रसिध्द असलेल्या हापूस आंब्याचे उत्पादन आता ४० टक्क्यावर आले आहे. यावर्षी त्यात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. त्यामुळे आंबा व काजू उत्पादक आर्थिक संकटात सापडले आहेत. कोकणासह रायगड जिल्ह्यातील आंबा, काजू उत्पादकांना नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाकडून करण्यात आली आहे. याबाबत संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांना निवेदन दिले आहे.**



कोकणात आंबा पिकाचे क्षेत्र पावणे दोन लाख हेक्टर आहे. त्यात रत्नागिरी जिल्ह्यात एक लाख २० हजार हेक्टर, सिंधूदुर्गमध्ये ३८ हजार हेक्टर, रायगड जिल्ह्यात १९ हजार हेक्टर क्षेत्र आहे.ठाणे व पालघरमध्ये मर्यादीत स्वरुपात लागवड केली जाते. यातून दोन लाख ७० हजार मेट्रीक टन इतके वार्षिक उत्पादन मिळते. दरवर्षी २५ हजार मेट्रीक टन इतकी हापूसची निर्यात होते. यातील निम्मी निर्यात ही मध्य पूर्वेतील देशांमध्ये होते. यंदा आंब्याचे उत्पादन फारच कमी आहे.अमेरिका-इराण युध्दाचा आंबा निर्यातीला मोठा फटका बसला आहे. निर्यात ठप्प झाली आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती व देशांतर्गत बाजारपेठांमध्ये आंब्याला कमी दर मिळत आहे. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. काजू उत्पादकांचीदेखील तीच अवस्था झाली आहे.

यावर्षीचे आंब्याचे उत्पादन दहा टक्के येणार असल्याचा अहवाल कोकण कृषी विद्यापीठ यांच्यामार्फत शासनाला पाठविण्यात आला आहे. मात्र शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी हेक्टरी २२ हजार रुपये ही अत्यल्प भरपाई जाहीर केली आहे. ही भरपाई तुटपूंजी आहे. त्यामुळे शासनाने भरीव भरपाई द्यावी अशी मागणी राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी केली आहे.

### शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच

अवकाळी, वाढते तापमान व कीड रोगांचा मोठ्या प्रमाणात होणारा प्रादुर्भाव यामुळे नुकसानीची तीव्रता मोठी आहे. यावर्षी आंब्याची मोहर प्रक्रिया थांबली. आलेला मोहर जळून गेला. ४० टक्के झाडांना मोहरच आला नाही. मोहर संवर्धनासाठी शेतकऱ्यांनी महागडी रासायनिक औषधांचा वापर करून भरमसाठ खर्च केला. परंतु यंदा शेतकऱ्यांच्या पदरात निराशाच पडली आहे.

## समर कॅम्पचे आयोजन

**आगरदांडा :** मुरूड जंजिरा नगरपरिषदच्यावतीने समर कॅम्पचे आयोजन २३ ते ३० एप्रिल या कालावधीत इयत्ता ५ वी ते १५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी मुरूड सर एस ए.हायस्कुल येथे करण्यात आले आहे. सदर कॅम्पचा शुभारंभ गुरूवारी सकाळी ७ वाजता नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत तसेच मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या शुभ हस्ते होणार आहे. सकाळी ७ वाजता नाव नोंदणी, लाईन अप, ग्रुप पाडणे आणि ग्रुप लीडर निवड सकाळी ८ ते ९ वाजता प्रार्थना, योगा, सूर्यनमस्कार १.३० शस्त्र परिचय, काठी सलामी आणि पवित्रा, सकाळी ११.०० काठी सराव, दुपारी १ वाजता रामरक्षा, हनुमान चालीसा, प्रार्थना, गेस्ट लेक्चर व्यक्तिमत्व विकास, स्वसंरक्षण प्रशिक्षण आणि शारीरिक कवायत, राष्ट्रगीत असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

# ऑनलाईन संमती विरोधात शेतकऱ्यांमध्ये असंतोष

**। खरोशी । वार्ताहर ।**



अटल सेतू प्रभाव क्षेत्रातील १२४ गावांमधील भूसंपादनासाठी एमएमआरडीएकडून राबविण्यात येत असलेल्या ऑनलाईन संमतीपत्र प्रक्रियेविरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. १६ मार्च २०२६ च्या शासन निर्णयाच्या आधारे सुरू झालेली ही प्रक्रिया शेतकऱ्यांच्या घटनात्मक हक्कांवर गदा आणणारी असल्याचा आरोप करत एमएमआरडीए विरोधी भूमिपुत्र संघर्ष संघटना, पेण यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी, पेण यांना सविस्तर निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, आधार, ७/१२ व ८-अ यांसारखी कागदपत्रे सहज उपलब्ध असल्याने, सुरक्षित प्रमाणीकरणा शिवाय ऑनलाईन संमती प्रक्रिया राबविल्यास तृतीय पक्षाकडून खोट्या संमती सादर होण्याचा गंभीर धोका आहे. भविष्यात शेतकऱ्यांनी स्वतः संमती दिली असा दावा करून त्यांना कायदेशीर अडचणीत टाकले जाऊ शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली असून, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत सुरक्षित प्रमाणीकरण आवश्यक असल्याचेही अधोरेखित करण्यात आले.

### ■ २८ एप्रिलला आंदोलनाचा इशारा

संघटनेने स्पष्ट केले की, संमती ही प्रत्यक्ष, दबाव मुक्त व पारदर्शक पद्धतीने नोंदविणे आवश्यक आहे. ऑनलाईन प्रक्रियेत शेतकऱ्यांना योग्य माहिती व स्वतंत्र निर्णयाची हमी मिळत नसल्याने ही प्रक्रिया एकतर्फी ठरत असल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे ऑनलाईन संमती प्रक्रिया तात्काळ स्थगित करून ग्रामपातळीवर प्रत्यक्ष पडताळणी, व्हिडिओ नोंद व अधिकृत साक्षीदारांच्या उपस्थितीत संमती घेण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना प्रकाश माळी, नंदा म्हात्रे, सी.आर. म्हात्रे, प्रितेष माळी, जितेंद्र ठाकूर, अजित पाटील, शामकांत म्हात्रे मोहीनी गोरे यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. संघटनेने इशारा दिला आहे की २६ एप्रिल २०२६ पर्यंत प्रक्रिया मागे घेतली नाही, तर २८ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# घराघरांत लाल मसाला तयार करण्याची धामधूम

## ।। महिलांना रोजगाराची संधी ।। मिरची वाळवण्यापासून दळणापर्यंत कष्टप्रद प्रक्रिया

**। रायगड । प्रतिनिधी ।**

उन्हाची तीव्रता वाढू लागली की घराघरांत पारंपरिक कामांना सुरुवात होते. विशेषतः महिलांकडून विविध प्रकारचे मसाले तयार करण्याची लगबग सुरू होते. दररोजच्या स्वयंपाकात वापरला जाणारा लाल मसाला हा प्रत्येक घराचा अविभाज्य भाग असल्याने त्याची गावच्या मोकळ्या जागेत मोठ्या उत्साहात तयारी केली जाते.सध्या बाजारपेठेत मसाल्यांच्या खरेदीला चांगलाच वेग आला आहे.



दरवर्षीप्रमाणे मार्च ते एप्रिल महिन्यात तिखट बनवण्याची तयारी सुरू होते आणि आता ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. रायगडात गावागावांमध्ये मसाला बनवण्याचा हंगाम रंगात आला आहे. या ठिकाणी अजूनही पारंपरिक पद्धती जपल्या जात असून अंगणात किंवा मोकळ्या जागेत मिरच्या वाळवताना दिसतात. काही ठिकाणी महिलांचा एकत्रित गट तयार होऊन मोठ्या प्रमाणावर मसाले बनवले जातात.

दरम्यान, या प्रक्रियेत महिलांची मेहनत खूप मोठी असते. मिरची निवडणे, वाळवणे, भाजणे, दळणे आणि योग्य प्रमाणात मिश्रण करणे, या सर्व टप्प्यांमध्ये बारकाईने लक्ष द्यावे लागते. त्यामुळे हा केवळ घरगुती उपक्रम न राहता अनेक महिलांसाठी रोजगाराचे साधनही बनला आहे. काही महिला घरगुती मसाले विकून अतिरिक्त उत्पन्न मिळवत आहेत, तर काही जणी ऑर्डरनुसार मसाले तयार करून देतात.

घरगुती मसाल्यामुळे स्वयंपाकाला खास चव येते, याची जाणीव सर्वांना असल्याने शहरात राहणारे आपल्या नातेवाईकांकडून मसाले तयार करून घेत आहेत. त्यामुळे महिनाभर आधीपासूनच गृहिणींची मिरची आणि मसाल्याच्या साहित्याच्या खरेदीसाठी धावपळ सुरू झाली आहे. पारंपरिक पद्धतीने मसाले तयार करण्याची परंपरा आजही जपली जात असल्याचे हिना बामणे यांनी सांगितले.

### अशी असते प्रक्रिया

यावेळी, सुका मसाला, लाल मसाला, घाटी मसाला, गोडा मसाला तसेच आगरी-कोळी मसाला असे विविध प्रकार घराघरांत बनवले जातात. प्रत्येक कुटुंबाची मसाला तयार करण्याची पद्धत वेगळी असली तरी त्यामागील चव आणि परंपरा एकसारखीच जपली जाते. ऐन हंगामात मिरचीचे दर वाढतात, त्यामुळे महिला आधीच मिरची खरेदी करून ती तीन ते चार वेळा उन्हात वाळवून ठेवतात. त्यानंतर त्यात गरम मसाला, धणे, बडीशेप यांसारख्या घटकांचे मिश्रण करून मसाला तयार केला जातो.

**मुरूड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड**
**निविदा सुचना**
**जा.क्र.१४७ मुनप/निविदा/२०२६-२७**

मा. मुख्याधिकारी, मुरूड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून ''सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरीता मुरूड नगरपरिषद हद्दीतील पर्यावरण नियंत्रण व स्वच्छता फी वसली करणे'' या कामाची निविदा मागविण्यात येत आहे. या कामां संबंधी सविस्तर तपशिल व अटी-शर्ती मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालय, जि. रायगड येथे दिनांक २४/०४/२०२६ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक ०४/०५/२०२६ आहे.

दिनांक :- २२/०४/२०२६

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरूड जंजिरा नगरपरिषद**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक यतिन अमृतलाल पटेल क्विक इन्फास्ट्रेचर ॲड डेव्हलपर्स प्रा. लि. तर्फे डायरेक्टर यांचे कडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| २४२/३ | ०-५७-०० | १७.०१ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक २३/४/२०२६

**ॲड.रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँके शेजारी,
ता. अलिबाग, जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थि मौजे शिर्की, ता. पेण, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमाने मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - शिर्की, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | गट क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| प्रभाकर शंकर गावंड | ९३ | - | ०-१३.१० | २.०६ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट हिस्सा, संपादन रिक्झिशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५(पंधरा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील प्रभाकर शंकर गावंड यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि : २३/०४/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ. सोसा. लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे चेंढरे ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे क्रमांक ६३/१ब, बिनशेती प्लॉट क्रमांक १, क्षेत्र ६७६.०० चौ.मी. या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या प्रभात नगर को. ऑप. हो. सो. मधील तळ मजल्यावरील निवासी सदनिका क्रमांक ४ क्षेत्र ६७६ चौ.फुट. म्हणजे ६२.८२ चौ. मीटर (ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्रमांक ८४८/४) या निवासी सदकेचे विद्यमान मालक सौ.प्रतिभा जनार्दन बारस्कर यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे. पाठवाव्यात.

अलिबाग,
दिनांक :- २२/०४/२०२६

**ॲड. (डॉ.) दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र.१, तळ मजला,
लक्ष्मी को.ऑप.हौ.सोसायटी, कामत आळी,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

वर नमुद जाहीर नोटीस वर्तमानपत्र दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यास माझी पुर्ण संमती आहे.

**सौ. प्रतिभा जनार्दन बारस्कर**

**पान १ वरून**

## मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण होण्यापूर्वीच टोल वसुली होणार!

टोल वसुली सुरू केली होती, ती आंदोलनानंतर बंद करण्यात आली. त्यानंतर गेली तीन वर्षे टोलनाका सुरू होण्याबाबत केंद्र सरकारकडून कोणतीही कार्यवाही झाली नव्हती.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने ओसरगाव टोल नाक्यावरून टोल वसुली सुरू करण्यासाठी १७ एप्रिलला ऑनलाईन निविदा प्रसिद्ध केल्या आहेत. यात जानवली पूल ते पत्रादेवी या ६० किलोमीटर लांबीच्या मार्गासाठी दुचाकी आणि तीन आसनी वाहने वगळता उर्वरित सर्व वाहनांसाठी टोल वसुलीसाठी एजन्सी निश्चित केली जाणार आहे. यात दरवर्षी वाहनांकडून ५७.८८ कोटींचा टोल वसूल होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.मुंबई-गोवा महामार्गावरून मोटार, जीप आणि व्हॅन यांसारखी हलकी वाहने जाण्याचे प्रमाण सर्वाधिक ४९ टक्के आहे. बस आणि ट्रक (दोन ॲक्सल) वाहनांचे प्रमाण २७ टक्के, मल्टी ॲक्सल वाहनांचे प्रमाण १९ टक्के असल्याचेही निविदा नोटिशीमध्ये नमूद केले आहे.

## पाणीटंचाईच्या झळा तीव्र

सुरु झाले आहेत. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पनवेल, कर्जत, खालापूर, पेण, महाड, श्रीवर्धन, माणगांव या आठ तालुक्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ प्रचंड वाढला आहे. ३१ गावे, १३१ वाड्यांमधील ४५ हजार ९९ नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. पाणीटंचाई दूर करण्यासाठी प्रशासनाकडून ३६ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु केला आहे.

**गावे, वाड्यांवर दृष्टीक्षेप**

| तालुके | गावे | वाड्या | लोकसंख्या | टँकर्स |
|---|---|---|---|---|
| अलिबाग | ०३ | ०० | ६४७९ | ०२ |
| पनवेल | ०३ | ०२० | ५६१७ | ०४ |
| कर्जत | ०२ | ०३ | २६६० | ०४ |
| खालापूर | ०४ | ०९ | ६३६४ | ०५ |
| पेण | ०५ | ५६ | १७०९९ | १२ |
| महाड | १२ | ५७ | ५०६१ | ०७ |
| श्रीवर्धन | ०१ | ०२ | १३३५ | ०१ |
| माणगाव | ०१ | ०२ | ४८४ | ०१ |
| **एकूण** | **३१** | **१३१** | **४५०९९** | **३६** |

## राजिपच्या अतिरिक्त सीईओ डॉ. सातपुते

असून बुधवारी (दि. २२) त्यांनी सुत्रे हाती घेतली.

रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बडे यांची यांची पुणे येथे दिव्यांग कल्याण विभागाच्या आयुक्तपदी नियुक्ती झाली. मात्र त्यांच्या जागी नवीन नियुक्ती करण्यात आली नव्हती. हे पद अनेक महिने रिक्त होते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक यांच्याकडे अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला. ग्रामीण विकास विभागाचे काम करीत असताना हंगामी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्या काम पहात होत्या. रायगड जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीपदी पालघरमधील ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक डॉ. रुपाली सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. रुपाली सातपुते यांनी यापूर्वी पालघर जिल्ह्यातील कुपोषण नियंत्रण, तसेच विकसित भारत संकल्प यात्रा यांसारख्या महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय भूमिका बजावली आहे. पालघर येथे आयोजित कोकण सरस महोत्सवासारख्या कार्यक्रमांच्या आयोजनात त्यांनी प्रमुख भूमिका बजावली आहे. आता त्यांची रायगड जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी बुधवारी (दि.२२) रायगड जिल्हा परिषद येथे प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे यांच्याकडून पदभार स्वीकारला. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पाठारे यांनी त्यांचे स्वागत केले.

## पळसदरी तलावात तरुणाचा बुडून मृत्यू

मिळताच कर्जत पोलीस ठाण्याचे कर्मचारी तसेच खोपोली येथील हेल्प फाऊंडेशनच्या रेस्क्यू टीमने घटनास्थळी धाव घेत शोध मोहीम सुरू केली. रात्री उशिरापर्यंत शोधकार्य सुरू होते, मात्र अंधारामुळे मोहीम थांबवावी लागली.

आज सकाळी पुन्हा शोध मोहीम राबवण्यात आली असता रेस्क्यू टीमला यश आले आणि आर्यनचा मृतदेह तलावामधून बाहेर काढण्यात आला. अनोळखी ठिकाणी पाण्याची खोली व परिस्थितीची माहिती नसताना पोहण्यासाठी उतरणे जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, पोलीस पाटील विनया खोपकर, डेला डवेंचरचे गणेश गीध आणि पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## सांगोला पंचायत समितीत आमदार बाबासाहेब देशमुखांनी घेतली झाडाझडती

मात्र सर्वच टेबल खुर्चीवर धुळीचे प्रमाण दिसून आले. संपूर्ण हॉलची पाहणी केली असता तेथे अडगळ दिसून आली. यावेळी त्यांनी तात्काळ प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना व शिपायांना या गोष्टीचा जाब विचारला पंचायत समिती सर्वसामान्यांसाठी असून या इमारतीची निगा राखण्याचे काम पंचायत समिती प्रशासनाचे आहे, असे खडसावून सांगितले. स्वच्छता ठेवा अशी तंबी दिली. आमदारांच्या या रुद्रावतारामुळे प्रशासनाची भंबेरी उडाली. यानंतर आमदार बाबासाहेब देशमुख यांनी संपूर्ण पंचायत समिती ऑफिसच्या प्रत्येक टेबलची पाहणी केली. धुळीचे प्रमाण दिसून आले. जिथे अडगळ अस्वच्छता त्रुटी दाखवून तात्काळ त्याची दुरुस्ती स्वच्छ करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. नंतर पंचायत समितीमध्ये आल्यानंतर अस्वच्छता दिसता कामा नये, असे स्पष्ट शब्दात खडसावून सांगितले. आमदार बाबासाहेब देशमुख यांच्या या कृतीमुळे पंचायत समितीमध्ये आलेल्या सर्वसामान्य नागरिकांनी जनतेने त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

## अनोळखी महिलेची आत्महत्या

असल्याचे जीव रक्षकांच्या लक्षात आली. त्यांनी ही बाब अलिबाग पोलिसांच्या निदर्शनास आणून दिली. पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांच्यासह त्यांच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. बेशुध्द अवस्थेत असलेल्या महिलेच्या बाजूला एक पर्स होती. त्या पर्सची पाहणी केली असता, ओळखीचा कोणताही पुरावा सापडला नाही.अखेर पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने बेशुध्द अवस्थेत महिलेला जिल्हा रुग्णालयात आणले. त्यावेळी डॉक्टरांनी तपासून ती अगोदरच मृत असल्याचे घोषित केले. दरम्यान महिलेच्या पर्समध्ये एक चिठ्ठी सापडली आहे. या चिठ्ठीमध्ये ती आत्महत्या करीत असल्याचे लिहून ठेवले आहे. पी. जी. पाटील अशी तिने सही केली आहे. त्यामुळे या महिलेने आत्महत्या का केली हे लवकरच समोर येण्याची शक्यता आहे. मृत महिलेचे वय साधारणतः ४० वर्षे असून उंची साडेपाच फुट, अंगाने सडपातळ व रंग निमगोरा आहे. कोणाला ओळख पटल्यास अलिबाग पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## शाह सरकारविरोधात जनआक्रोश

याशिवाय भारतातून १०० रुपयांहून अधिक सामान आणल्यास त्यावर अनिवार्यपणे कस्टम ड्युटी लावण्याच्या निर्णयाविरोधात सीमेवरील भागातील लोकांमध्ये नाराजी आहे. तसेच सरकारचं हे धोरण सर्वसामान्य जनतेवर अनावश्यक ओझं टाकणारं असल्याचा आरोप आंदोलकांकडून केला जात आहे.याबरोबरच नवनिर्वाचित सरकारमधील गृहमंत्री सुदन गुरुंग यांच्याविरोधातही आंदोलक आक्रमक झाले आहेत.

तसेच बेकायदेशीर मालमत्ता आणि संशयास्पद व्यवहारांमुळे त्यांच्या राजीनामाच्या मागणीने जोर धरला आहे. नेपाळमधील प्रसारमाध्यमांमध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तानुसार गृहमंत्री सुदन गुरुंग यांच्यावर ज्ञात स्रोतांपेक्षा अधिक संपत्ती गोळा करणे, शेअर बाजारामध्ये दलालांच्या मदतीने संशयास्पद व्यवहार करणे असे आरोप करण्यात येत आहेत. सरकार लोकविरोधी धोरणे लादत आहे, असा आरोपही राजकीय पक्ष आणि आंदोलकांकडून केला जात आहे.

## मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर दोन दिवसांचा ट्रॅफिक मेगाब्लॉक

असल्यास दिलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. दरम्यान उन्हाळ्याचे दिवस आहेत. त्यामुळे प्रशासनाकडून प्रवाशांसाठी प्रवासादरम्यान काही अडचण आली तर मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग नियंत्रण कक्ष (९८२२४९८२२४) किंवा महामार्ग पोलीस (९८३३४९८३३४) यांच्याशी संपर्क साधता येईल. हा ट्रॅफिक ब्लॉक आवश्यक देखभाल कामांसाठी घेण्यात आला असून भविष्यात रस्त्यावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुरळीत होण्यासाठी ही कामे महत्त्वाची असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सांगण्यात आले आहे.

## पाचव्या मजल्याचा स्लॅब कोसळला

तसेच चौथ्या मजल्यावर कोसळलेला स्लॅब पुढे तिसऱ्या मजल्यावर अडकून थांबल्याने खालील मजल्यांवर मोठे नुकसान होण्यापासून बचाव झाला. घटनेनंतर रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची माहिती मिळताच नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन विभागासह नेरुळ अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने तात्काळ बचावकार्य हाती घेत इमारतीतील सर्व नागरिकांना सुरक्षितरीत्या बाहेर काढले. प्रभावित घरातील साहित्य बाहेर काढण्यात आले असून, नागरिकांना धोक्याच्या परिस्थितीतून बाहेर काढण्याची प्रक्रिया काही काळ सुरू होती.सदर इमारतीत एकूण २१ कुटुंबे वास्तव्यास होती. महापालिका प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण इमारत रिकामी केली. यापैकी काही कुटुंबांनी नातेवाईकांकडे तात्पुरता आश्रय घेतला आहे, तर उर्वरित कुटुंबांची सोय कुकशेत, सेक्टर १४ येथील प्रभाग समिती कार्यालयाजवळील नवीन मार्केट इमारतीत करण्यात आली आहे.महापालिकेकडून ही इमारत धोकादायक ठरवून सील करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, इमारतीच्या संरचनात्मक सुरक्षिततेचा सखोल तपास करण्यात येणार आहे. बांधकामाची गुणवत्ता, देखभाल आणि रचनेतील त्रुटी यांचा अभ्यास करून पुढील कारवाई केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.या घटनेनंतर नेरुळ परिसरातील जुन्या आणि देखभाल न झालेल्या इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. स्थानिक नागरिकांकडून इमारतींची नियमित रचनात्मक तपासणी सक्तीची करण्याची मागणी होत असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी महापालिकेने ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## राज्यात तीन दिवस वादळाचा प्रभाव

वाढला तर सध्या राज्यात पुन्हा पश्चिमी विक्षोभाची स्थिती निर्माण झाली २५ एप्रिल पर्यंत राज्यातील मुख्यतः मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ तर कोकण पट्ट्यातील काही जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. तर या दरम्यान काही जिल्ह्यात उष्ण आणि दमट वातावरण राहील, असा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यात २५ एप्रिलनंतर पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव कमी होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, देशात सध्या अस्थिर हवामान असून काही ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. हवामान अभ्यासकांच्या मते, देशातील उत्तरेच्या राज्यांमध्ये २५ ते २७ एप्रिल दरम्यान एका नवीन पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव राहील, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

दरम्यान, एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील काही भागात पावसाळी हवामान असताना कमाल तापमानात काही ठिकाणी घट नोंदली जात होती. मात्र, सध्या पावसाळी हवामानाचा प्रभाव असताना कमाल तापमानात फारसा बदल दिसून येत नाही. किमान तापमानातही काही भागात सरासरी तापमानाहून वाढ नोंदली जात आहे. बुधवारी दक्षिण गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तसेच उत्तर कोकणातील काही भागात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट विभाग, सांगली, सातारा, सातारा घाट विभाग, पुणे आणि पुणे घाट विभाग, अहिल्यानगर, नाशिक आणि नाशिक घाट विभाग, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धाराशिव, सोलापूर, लातूर, चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली आदी भागांना हवामान विभागाकडून यलो अलर्ट देण्यात आला असून या भागात ताशी ३० ते ४० किमी वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## लालपरीला मिळणार नवं ग्लॅमर!

आहे. हा करार पाच वर्षांसाठी असणार असून, या काळात दोघेही एसटीच्या विविध जाहिराती, प्रचार मोहिमा आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होताना दिसतील. ग्रामीण आणि शहरी भागातील प्रवाशांपर्यंत एसटीची सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचवण्याचा हा प्रयत्न असल्याचं सांगितलं जातं आहे.

**याआधीही मराठी कलाकारांची साथ**

एसटी महामंडळासाठी प्रसिद्ध कलाकारांना ब्रॅण्ड ॲम्बेसिडर म्हणून निवडण्यात आलेलं. याआधी मकरंद अनासपुरे आणि दिवंगत विक्रम गोखले यांनी ही जबाबदारी सांभाळली होती. त्यांच्या माध्यमातून एसटीला एक वेगळी ओळख मिळाली होती. आता रितेश आणि जिनिलियाच्या लोकप्रियतेचा फायदा घेत एसटी महामंडळ नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. सोशल मीडियावरही या निर्णयाची चर्चा रंगली असून, चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. येत्या काळात या जोडीला लालपरीच्या प्रचारासाठी विविध कार्यक्रम आणि मोहिमांमध्ये पाहायला मिळणार आहे.

# दुसरी ते चौथीचा अभ्यासक्रम बदलणार

## नवीन अभ्यासक्रमासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण


● (छायाचित्रः समीर मालोदे)

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्यावतीने इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या शिक्षकांसाठी नवीन अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांपासून लागू होणाऱ्या नवीन अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. दि.४ मेपासून शिक्षकांच्या प्रशिक्षणास सुरुवात होणार आहे. या प्रशिक्षणासाठी शिक्षकांना उपस्थित राहण्याचे बंधन आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष १५ जून पासून सुरू होत आहे. त्यापूर्वी सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. हे प्रशिक्षण राज्यस्तर, जिल्हास्तर आणि तालुकास्तर अशा तीन टप्प्यांत पार पडणार आहे. राज्यस्तरासाठी दि.४ ते ७ मे (मराठी व उर्दू माध्यम), जिल्हास्तर दि.११ ते १४ मे (मराठी व अन्य माध्यम) व तालुकास्तर प्रशिक्षण दि.१८ ते ३० मे (मराठी व अन्य माध्यम) रोजी आयोजित केले आहे. उर्दू माध्यमासाठी हे प्रशिक्षण केवळ राज्य आणि जिल्हा अशा दोनच स्तरांवर आयोजित केले जाणार आहे. सहसंचालकांनी सर्व प्रादेशिक विद्या प्राधिकरण आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना या संदर्भात जिल्हास्तर सुलभकांची नावे त्वरित कळवण्याचे आदेश दिले आहेत. नवीन अभ्यासक्रम वर्गात शिकवताना शिक्षकांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत आणि अध्यापन प्रक्रिया सुलभ व्हावी, हा या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू आहे.

### अंमलबजावणीसाठी सूचना

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे सहसंचालक यांनी सर्व प्रादेशिक विद्या प्राधिकरण आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना या संदर्भात जिल्हास्तर सुलभकांची नावे त्वरित कळवण्याचे आदेश दिले आहेत. नवीन अभ्यासक्रम वर्गात शिकवताना शिक्षकांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत आणि अध्यापन प्रक्रिया सुलभ व्हावी, हा या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू आहे.

### प्रशिक्षण कालावधी अन् स्वरूप

इयत्ता दुसरीच्या शिक्षकांसाठी ३ दिवसांचे, तर तिसरी आणि चौथीच्या शिक्षकांसाठी ४ दिवसांचे प्रशिक्षण निश्चित करण्यात आले आहे. मराठी, उर्दू आणि इतर सर्व माध्यमांच्या शिक्षकांसाठी स्वतंत्र किंवा समन्वयाने प्रशिक्षणाची सत्रे घेतली जातील. विशेष म्हणजे, दुसरीच्या प्रशिक्षणाचा कालावधी कमी असला तरी, प्रशिक्षणाची सुरुवात मात्र सर्व वर्गांसाठी एकाच तारखेला होणार आहे.

# जिल्ह्यात गावठी दारूचा धंदा तेजीत



## गारंबी, केळघर उत्पादनाचे मुख्य ठिकाण

। मुरुड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याला हात भट्ट्यांची गावठी दारू पुरविणाऱ्यांचा धंदा तेजीत सुरू आहे. मुरुड व रोहा तालुक्यातील गारंबी, गोपाळ वाट परिसरातील सर्वच गावांमध्ये गावठी दारूचे होलसेल व्यापारी आहेत. या ठिकाणाहून संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गावठी दारूचे वितरण बिनदिक्कत पणे सुरु आहे. यांना वरदहस्त कुणाचा, असा सवाल सर्वसामान्य जनतेने केला आहे.

गावठी दारूमुळे तरुण मुले व महिला व्यसनाधिन होऊन गावातील लोकांना खूप त्रास देत आहेत. तसेच, या गावठी दारूमुळे अनेक लोकांची घरे उद्ध्वस्त होत आहेत. तर, अनेकांचा संसार उघड्यावर पडला आहे.रोहा तालुक्यातील मसाडी, बेलवाडी, फणसाडी, झापडी व पांगलोली येथील हातभट्टीची दारु रोह्यासह मुरुड, अलिबाग, म्हसळा, पेण इत्यादी ठिकाणी वितरीत करण्यात येत आहे. तसेच, मुरूड तालुक्यातील टिटवी, पारगाण, वाघिरपट्टी येथेही गावठी दारू हातभट्टी मोठ्या प्रमाणात चालू आहेत. या संदर्भात सर्व सामान्य जनतेकडून पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज देण्यात आला आहे. दरम्यान, फणसवाडी (धनगरवाडी) येथील गावठी दारू हातभट्टी पोलिसांकडून उद्ध्वस्त करण्यात आली. त्याचे जनतेतून कौतुक होत असताना इतर गावांतील मोठ्या प्रमाणात चालू असलेल्या हातभट्टीवर पोलिसांचे जाणूनबुजुन दुर्लक्ष होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या सर्व गावांचे खूप नुकसान होत आहे.

या परिसरातील एकाच गावावर कारवाई का? इतर गावांवर पोलीस मेहेरबान आहेत का? या गावांमध्ये कारवाई कधी होईल, असे प्रश्न सर्वसामान्य जनतेमधून विचारले जात आहेत. तरी, या तक्रारीची दखल घेऊन आपण या गोष्टीकडे पूर्णतः लक्ष देऊन याबाबत आपण योग्य ती कारवाई करावी, अशी नम्र विनंती सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. तरी, मुरुड पोलिसांनी लवकरात लवकर कडक कारवाई करावी, अशी मागणी देखील केली जात आहे.

# बळीराज सेनेचा वर्धापन दिन उत्साहात




। पनवेल । प्रतिनिधी ।

बळीराज सेना या राजकीय पक्षाचा वर्धापन दिन सोहळा दादर येथे पार पडला. यावेळी डिजिटल मिडीया प्रमुख दिनेश हरड व त्यांच्या टिमने तयार केलेले पक्ष संघटन आणि कार्यकर्ता सक्षमीकरण यांचे प्रेझेंटेशन ॲड. विनेश वालम यांनी उपस्थितांना समजावून सांगितले. प्रेझेंटेशनमध्ये बळीराज सेना पक्षाने आतापर्यंत केलेल्या कामाचा आढावा आणि पुढील राजकीय यशस्वी वाटचालीसाठी तयार केलेला रोडमॅप दाखविण्यात आला. भविष्यकाळात आपल्या पक्षाने कोणती कार्ये केली पाहिजेत यांचे नियोजन सर्व कार्यकर्त्यांना समजावून सांगितले. त्यानंतर बळीराज सेनेचे कार्यकर्ते असलेले विविध विभागातील पदाधिकारी शहापूरचे दशरथ भोईर, अंधेरीचे संतोष चव्हाण, नाणार रिफायनरी विरोधक मानसी धनावडे यांनी आपले अनुभव सर्वांसमोर कथन केले.

# पनवेलमध्ये वाहतूक कोंडीवर तोडगा



। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या वाहतूक कोंडी व प्रदूषणाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी 'पॉड टॅक्सी' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आहे. नगरसेविका सायली सरक यांनी हा अभिनव प्रस्ताव मांडला असून, शहराच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेसाठी तो महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे.

खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल आणि पनवेल या भागांमध्ये दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असून, त्यामुळे वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषण गंभीर समस्या बनली आहे. यावर शाश्वत उपाय म्हणून पॉड टॅक्सी प्रणाली प्रभावी ठरू शकते, असे मत सायली सरक यांनी व्यक्त केले आहे. या संदर्भात त्यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या प्रकल्पाबाबत सरनाईक यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली असून, पनवेलमध्ये पॉड टॅक्सी सुरू करण्याबाबत अनुकूलता दाखवली आहे. तसेच, नगरसेविका सरक यांनी महापौर नितीन पाटील आणि महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनाही यासंदर्भात निवेदन दिले आहे. भविष्यातील गरज ओळखून पालिकेमार्फत लवकरच सर्वेक्षण करण्यात येणार असून, त्यानुसार पॉड टॅक्सी प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

# सुवर्णा मोरे यांचे पोलीस प्रशासनाला निवेदन

। खोपोली । प्रतिनिधी ।

राज्यात महिलांवरील अत्याचारात वाढ होताना दिसत आहे. त्यात महिलांना मारहाण, त्यांच्या हत्या, लैंगिक अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, अपहरण यासह लहान मुलामुलींचे शोषण अशा घटना वारंवार घडत आहेत. अशाच गंभीर घटना खोपोली शहरात घडू नये यासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या शहर अध्यक्षा तथा नगरपरिषदेच्या सभापती सुवर्णा मोरे यांनी दि.२० एप्रिल रोजी खोपोलीचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांची भेट घेतली. यावेळी महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचारात वाढ झाली असून कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने स्थिती गंभीर आहे. यासंदर्भात खोपोली तातडीने कृती आराखडा तयार करून महिलांना सुरक्षित वातावरण देण्याच्या संदर्भात चर्चा करून निवेदन दिले. यावेळी पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी सकारात्मक चर्चा केल्याने सुवर्णा मोरे यांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अबू जलगावकर, प्रज्ञा महाडिक, जयश्री डोंगरे, रंजना हांडे, वैशाली भोसले, कल्याणी लोखंडे, वृषाली रगडे, अंजली पवार आदी प्रमुख उपस्थित होते.

# चोरटा सोन्याची चेन खेचून पसार

**नवीन पनवेल :** ४९ वर्षीय इसमाच्या गळ्यातील सोन्याची चैन खेचून नेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कामोठे सेक्टर ६ 'अ' येथील राहुल मधुकर सोनटक्के हे रामशेठ ठाकूर शाळेच्या पुढे कामोठे येथे आले असता दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरदस्तीने चोरी करून पळून गेले. ही चेन पंधरा ग्राम वजनाची असून त्यामध्ये तीन ग्राम वजनाचे सोन्याचे गणपतीचे पेंडल होते. या प्रकरणी कामोठे पोलीस अधिक तपास करत आहेत.

# उलवेत एमडीएमए गोळ्या जप्त


। पनवेल । प्रतिनिधी ।

उलवे परिसरात एमडीएमए या अमली पदार्थांच्या गोळ्या विक्रीसाठी आलेल्या तरुणाला अमली पदार्थविरोधी पथकाने सापळा रचून अटक केली. सुमीत गोपाळ राठोड (२५) असे अटक केलेल्याचे नाव असून त्याच्याकडून ५ लाख रुपये किमतीच्या ५० एमडीएमए गोळ्या जप्त करण्यात आल्या. या प्रकरणातील इतर तीन फरारी आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, उलवे सेक्टर १८ येथे अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी एक व्यक्ती येणार असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी कक्षाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने परिसरात सापळा लावला. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी छापा टाकून सुमीत राठोड याला ताब्यात घेतले. पोलिसांनी अंगझडती घेतली असता त्याच्याकडे विक्रीसाठी आणलेल्या ५० एमडीएमए गोळ्या आढळल्या. जप्त करण्यात आलेल्या या गोळ्यांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमत सुमारे ५ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. या कारवाईप्रकरणी उलवे पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शालेय साहित्य खरेदीत पारदर्शकतेचे आदेश

## पेणमधील नामांकित शाळांमध्ये जीआरला केराची टोपली



। पेण । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासनच्या प्राथमिक शिक्षण संचालनालय मार्फत शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वाचे निर्देश जारी करण्यात आले आहेत. या संदर्भातील शासन निर्णय दि.१३ एप्रिल रोजी निर्गमित करण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी सर्व व्यवस्थापनांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये बंधनकारक करण्यात आली आहे. परंतु, पेण तालुक्यातील मोठ्या प्रमाणात नामवंत इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये या आदेशाला डावलून शिक्षण संस्था मनमानी करत आहेत.

राज्य शासानाच्या जीआरनुसार, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले वह्या, पुस्तके, गणवेश इत्यादी शैक्षणिक साहित्य निर्धारित दरात आणि गुणवत्ता राखूनच खरेदी करणे बंधनकारक आहे. शाळांनी कोणत्याही विशिष्ट दुकानदाराकडून सक्तीने साहित्य खरेदी करण्यास भाग पाडू नये. तसेच, पालकांवर अनावश्यक आर्थिक बोजा पडणार नाही याची खबरदारी घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, एनसीईआरटी/एससीईआरटी (बालभारती) यांच्या अभ्यासक्रमानुसारच पाठ्यपुस्तकांचा वापर करण्याचे सांगण्यात आले आहे. खासगी प्रकाशनांच्या पुस्तकांची सक्ती टाळण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, या आदेशांचे उल्लंघन केल्यास संबंधित शाळा व्यवस्थापन व जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल. तसेच, पालक व विद्यार्थ्यांकडून तक्रारी आल्यास तात्काळ चौकशी करून योग्य ती कार्यवाही केली जाईल. या निर्णयामुळे शाळांमधील शैक्षणिक साहित्य खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता वाढेल आणि पालकांची आर्थिक लूट थांबेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. परंतु, पेण तालुक्यामध्ये या पेक्षा विरोधाभास पहायला मिळत आहे. या संदर्भात गट शिक्षण अधिकारी शर्मिला शेंडे यांच्याशी 'कृषीवल'च्या प्रतिनिधींना संवाद साधला. त्यावेळी त्यांनी चौकशी करून कायदेशीर कारवाई करणार असल्याचे सांगितले.

# लाल मैदानाची स्वच्छता मोहीम

## निवडक

### व्यापाऱ्याची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** व्यापाऱ्याच्या मोबाईलवर एका व्यक्तिने आरटीओ चलनची डॉट एपीके ॲपची फाईल पाठवली. त्या व्यापाऱ्याने ते एपीके ॲप उघडले असता, त्यांच्या मोबाईलमध्ये आरटीओ चलन या नावाने ॲप डाऊनलोड झाले. त्यांनतर सायबर चोरट्याने व्यापाऱ्याच्या मोबाईलचे ॲक्सेस स्वतःकडे घेतले. त्यांनतर त्या व्यापाऱ्याच्या नकळत त्यांच्या एका बँकेतील सेव्हींग खात्यामधून एकुण ३ लाख ७४ हजार ५९८ रुपये व दुसऱ्या बँक खात्यामधून ४८ हजार ५०० रुपये स्वतःच्या बँक खात्यात घेतले. अशी एकुण ४ लाख २३ हजार ९८ रुपयांचीची फसवणूक सायबर चोरट्याने केली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

### स्टंटबाजीला विरोध करणाऱ्या तरूणाला मारहाण

**पनवेल :** स्टंटबाजी करणाऱ्या तरुणाला हटकले असता त्या तरुणाने इतर दोघांच्या मदतीने विरोध करणाऱ्यास मारहाण करून त्याला जखमी केल्याची घटना घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नील भरत पुजारा असे मारहाण करण्यात आलेल्या तरुणाचे नाव असून तो एमजी रोड, पनवेल येथे राहतो. नील हा घरी जात असताना त्याची दुचाकी दर्गाजवळ आली असताना त्याठिकिणी एक दुचाकी चालक स्टंटबाजी करत नीलच्या बाजून गेला. त्यावर नील याने त्याला 'तू मला उडवशील का?' असा प्रश्न विचारला. त्यानंतर त्या रायडरने त्याला उलट उत्तर देत हा 'रायडर लोकांचा भाग आहे, तुला काय करायचे आहे', असे सांगत त्याच्याशी हुज्जत घातली. त्यानंतर त्याने त्या ठिकाणी उभे असलेल्या त्याच्या दोन साथीदारांसोबत नील याला मारहाण केली. या मारहाणीत नील याच्या डोळ्यातून रक्त येऊ लागल्याने त्याला चक्कर आली. त्यानंतर नील याला मारहाण करणारे तिघेजण तेथून निघून गेले. या घटनेनंतर नील याला लक्ष्मी आय केअर पनवेल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

### चोरीचा प्रयत्न करणाऱ्यावर गुन्हा

**पनवेल :** घराचा लॉक उघडून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनोळखी चोरट्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खारघर सेक्टर-१७ येथील अपूर्वा गुडेवार यांनी त्यांच्या वॉचमनला घराची चावी देऊन त्या पुण्याला गेल्या होत्या. दरम्यान, त्या परत आल्या. त्यानंतर त्यांनी वॉचमनकडील चावी घेऊन घर उघडले असता त्यांना घरातील कपाटाचा दरवाजा उघडा असल्याचे व त्यातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. तसेच, बेडरूममधील कपाटही उघडे होते. परंतु, घरातील वस्तूंची चोरी झाल्याचे आढळले नाही. त्यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता वॉचमनचा मित्र रोशन याने टी-शर्टने तोंड झाकून सीसीटीव्हीचा स्विच ऑफ केलेला दिसून आले. यावरून वॉचमेनने त्यांच्या घरात चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

### लाल मैदानाची स्वच्छता मोहीम

**उरण :** नगरपरिषद हद्दीतील स्वातंत्र्यवीर सावरकर (लाल) मैदानावर गुरुवारी (दि.२३) विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी दिली आ हे. मात्र, या स्वच्छता मोहिमेच्या पार्श्वभूमीवर एक गंभीर बाब समोर आली आहे. मैदानाला सावरकरांचे नाव असले तरी प्रत्यक्षात नामफलकच नाही. नगरपरिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत नियमित सफाई कामगारांसोबत अतिरिक्त मनुष्यबळही तैनात करण्यात येणार आहे. मैदानाची दयनीय अवस्था लक्षात घेता ही मोहीम व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असून, नगराध्यक्षा स्वतः या मोहिमेत उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी नागरिकांना, समाजातील नेत्यांना, व्यापारी-व्यावसायिकांना तसेच विशेषतः खेळाडूंना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मैदान आपले आहे, त्याची स्वच्छता राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असा संदेश प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

### पालीतील सोसायटी आदिवासीवाडीचा वनवास संपला

**पाली/बेणसे :** पाली नगरपंचायत अंतर्गत असलेल्या सोसायटी आदिवासीवाडी येथील नागरिकांचा अनेक वर्षांचा रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. नगरसेविका जुईली ठोंबरे व श्रीकांत ठोंबरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या दुर्गम भागात आता २० लाख रुपये निधीतून काँक्रीटचा पक्का रस्ता साकारत असून, वाडीतील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. सोसायटी आदिवासीवाडी येथे यापूर्वी साधा पायमार्गही उपलब्ध नव्हता. विशेषतः पावसाळ्यात येथील नागरिकांचे प्रचंड हाल होत असत. एखादी व्यक्ती आजारी पडल्यास तिला झोळीत घालून मुख्य रस्त्यापर्यंत न्यावे लागायचे. ही बिकट परिस्थिती पाहून ठोंबरे यांनी हा प्रश्न प्राधान्याने सोडवण्याचा विडा उचलला. पक्का रस्ता करण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती, मात्र स्थानिक शेतकऱ्यांनी संवेदनशीलतेचे दर्शन घडवत प्रत्येकी ५-५ फूट जागा रस्त्यासाठी दान केली. या सहकार्यामुळे सुरुवातीला ५ लाख रुपये खर्चून माती भराव व खडीकरण करण्यात आले. आता याच ठिकाणी २० लाख रुपयांच्या निधीतून डांबरीकरणाचा पक्का रस्ता तयार होत आहे.

## रुग्णांना वैद्यकीय सहाय्यता निधीचा आधार | ३८५ रुग्णांना सुमारे ३.३५ कोटींची मदत

# शासनाच्या आरोग्यविषयक योजनांतून मदत




। रायगड । प्रतिनिधी ।

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आधार ठरत आहे. रायगड जिल्ह्यात आर्थिक वर्षात ३८५ रुग्णांना सुमारे ३ कोटी ३५ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले आहे. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे. कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) व विद्युत अपघात रुग्ण अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत. राज्यातील शेकडो गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी भक्कम आधार मिळत आहे. सुधारित कार्यपद्धती, तातडीने निर्णय आणि समाजाच्या सहभागामुळे मदतीचा लाभ अधिक वेगाने गरजूंपर्यंत पोहोचत आहे. अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी रूग्णांनी १८००, १२३, २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

### आर्थिक वर्षातील मदत

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत रायगड जिल्ह्यातील ३८५ रुग्णांना सुमारे ३ कोटी ३५ लाख ३३ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

# भेंडखळजवळ कॉनएक्स सीएफएसला आग

**उरण :** भेंडखळ गावाजवळील कॉनएक्स सीएफएस येथे बुधवारी (दि.२२) सकाळी सुमारे साडेनऊ वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. या आगीत काही प्रमाणात माल जळाल्याची प्राथमिक माहिती मिळत असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल व सिव्हिल डिफेन्सची टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी वेळेवर कारवाई करत आग आटोक्यात आणण्यात यश मिळवले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे.

# लोकांच्या वेळेची किंमत

मुंबईतला एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. भाजपवाले सध्या महिला आरक्षणाच्या नावाने मोर्चे काढत आहेत. काल एक मोर्चा वरळीत काढण्यात आला. त्यावेळी या भागातली वाहतूक एक तासाच्या वर रोखून धरण्यात आली. वरळी हे मुंबईचे नाक आहे. दादर,वांद्रे आणि दक्षिण मुंबई यांना जोडणारे रस्ते इथून जातात. इथे कायम प्रचंड वाहतूक असते. आधीच उन्हाचा कडाका. त्यात अशा ठिकाणची वाहतूक एक तास रोखून धरली तर नागरिकांचे किती हाल झाले असतील याची कल्पनाही करवत नाही. पण भाजपला सत्तेची इतकी मस्ती आलेली आहे की, जनतेच्या कष्टांची त्याला पर्वा उरलेली नाही. मंत्री गिरीश महाजन व इतर नेते या मोर्चात सामील होते. अशा वेळी बराच काळ वाहतुकीत अडकलेली व मुलांना शाळेतून आणायला निघालेली महिला चिडली व तिने पोलिस अधिकारी तसेच मंत्री महाजन यांना फैलावर घेतले. इथून तोंडे काळी करा असे तिने इंग्रजीत त्यांना फर्मावले. त्याला देण्यासाठी महाजन यांच्यापाशी कोणतेही उत्तर नव्हते. नंतर पोलिसांनी त्यांना दमदाटी करण्याचा प्रयत्न केला. पण या महिलेने त्यांना जुमानले नाही. ही महिला उच्चभ्रू वर्गातील होती, इंग्रजीत बोलत होती, शिवाय सर्व मिडिया समोरच होता म्हणूनच तिला अटक वगैरे झाली नाही. शिवाय मोर्चा काढून आपण रस्ता अडवला आहे याची जाणीव बहुदा भाजपवाल्यांना असावी. ते काहीही असो. पण या निमित्ताने भाजपची मुजोरी आणि जनतेची असहायता व्यक्त झाली. भाजपला विरोध करणारी महिला व पुरुष गरीब, फाटके कपडे घातलेले वा ग्रामीण भागातले असते तर त्यांना भाजपवाल्यांनी नक्कीच घेरले असते. पोलिसांनी त्यांना अटक करून कदाचित मारझोडही केली असती. या महिलेला तसे झाले नाही. तरीही हजारो नागरिकांचा जो वेळ गेला तो गेलाच. त्याची भरपाई कशानेही होणारी नाही.

### मंत्रायल आणि न्यायालये

आपल्या सार्वजनिक जीवनात लोकांच्या जिवाला, आयुष्याला व वेळेला नगण्य किंमत आहे. आज मंत्रालयापासून ते कोणत्याही जिल्ह्याच्या कोणत्याही सरकारी कार्यालयात जा. तिथे फुटकळ कामे अडलेले, त्यासाठी पुन्हा पुन्हा खेटे मारावे लागणारे, अधिकाऱ्यांच्या भेटीसाठी तास न तास खोळंबून बसलेले लोक दिसतात. अनेकदा गावातून एसटी पकडून ते येतात. काम होत नाही. योग्य माणूस भेटत नाही. यांचा दिवसाचा रोजगार बुडतो. पण त्याची भरपाई होत नाही. हे असेच असते असे माणसे मानून चालतात. न्यायालयांमध्ये तर पाहायलाच नको. तारीख असली की हजर व्हावे लागते. समोरची पार्टी येणार नाही किंवा आपले प्रकरण बोर्डावर येणारच नाही हे ठाऊक असले तरीही हजर राहावेच लागते. हा वेळ फुकट जाणार हे दिसत असते. पण माणसे म्हणतात, भारतात हे असेच चालते. भारतात दर महिन्याला किमान दोन-पाच तरी सण किंवा जयंत्या मयंत्या असतात. आजकाल प्रत्येक समाजाच्या भावना तीव्र झाल्या आहेत. त्यामुळे सगळेच जण जोरात आवाज करून मिरवणुका काढतात. किंवा मग रस्ता अडवून मंडप वगैरे घालतात. पूर्वी मराठी प्रांतात तरी हिंदूंचे सण सौम्य पध्दतीने साजरे होत. पण आता गुढीपाडव्याला शोभायात्रा काढल्या जातात. गणपतीच्या मूर्ती आणण्याच्या आणि विसर्जनाच्या मिरवणुका कित्येक तास चालतात. पुण्यासारखी शहरे तर अनंत चतुर्दशीला दोन दिवस बंद राहतात. लाखो लोकांचा वेळ यात गुंतून पडतो. निवडणुका आल्या की, राजकीय पक्षांच्या सभा आणि मेळावे होतात. त्यांनी शहरांचे मुख्य रस्ते, चौक अडवले जातात. एरवी पंतप्रधान किंवा मुख्यमंत्र्यांचे दौरे लागले की वाहतूक वळवली वा रोखली जाते. काही रस्ते बंद केले जातात. मुंबईसारखी शहरे तर इतकी अवाढव्य वाढली आहेत की तिथे दिवसाचे चार-पाच तास प्रवासात जाणार हे गृहितच धरावे लागते. मेट्रो रेल्वे किंवा उड्डाणपुलांनी किंचितही फरक पडलेला नाही. आजही समजा अंधेरीहून बाहेर पडून पुण्याला जायचे असेल तर मुंबईबाहेर पडायलाच सहज एक दीड तास लागू शकतो. पुढे एक्स्प्रेसवेवरून समजा जोरात गेले तरी पुण्यात वाहतुकीची कोंडी असतेच.

### कोण उत्तरे देणार?

ही अवस्था आपल्या सर्वच शहरांची झाली आहे. पुण्यात बंगळुरुच्या खालोखाल आयटी कंपन्या आहेत. पण बंगळुरू आणि पुण्यात देशातला सर्वात घाणेरडी वाहतूक कोंडी पाहायला मिळते असे सर्वजण सांगतात. पुण्याहून नाशिक, नगर, सोलापूर किंवा कोल्हापूर कोणत्याही दिशेने वा रस्त्याने जा, तुम्हाला प्रचंड वाहतूक कोंडीत अडकावे लागते. या सर्व दिशांना बऱ्याच कंपन्या व कारखाने झाले आहेत. रोज ज्यांना इथे नोकरीसाठी जावे लागते त्यांचे हजारो तास रस्त्यावर वाहतुकीमध्ये वाया जातात. नागपूर, कोल्हापूर, संभाजीनगर अशी शहरे याच दिशेने वाटचाल करीत आहेत. आपल्या रायगड जिल्ह्यात मुंबई गोवा मार्गावरची माणगावजवळची कोंडी कुविख्यात आहे. इतकी वर्षे झाली. पण एक साधा उड्डाणपूल बांधून ही कोंडी फोडणे आपल्याला जमलेले नाही. हा पूल इतक्यात होण्याची काहीही चिन्हे नाहीत. तीच गोष्ट अलिबाग ते वडखळ किंवा अलिबाग ते मांडवा या रस्त्यांची आहे. पनवेल, खोपोली या शहरांमध्ये त्यांची त्यांची कोंडी आहे. एकूणच हा एक राष्ट्रीय प्रश्न आहे. प्रत्येक दिवशी कोट्यवधी मनुष्यतास या कोंडींमध्ये वाया जातात. हा वेळ वाचला असता तर माणसे कितीतरी चांगली कामे करू शकतात. किंवा आपापल्या कुटुंबासोबत घालवू शकतात. पण त्याऐवजी, रस्त्यावर आपले वाहन कसे पुढे जाईल याची स्पर्धा करण्यात, त्यातून लागणारे धक्के आणि होणाऱ्या मारामाऱ्या सहन करण्यात घालवतात. मोठी माणसे तर सोडाच लाखो लहान मुलांचा वेळही या वाहतूक कोंडीत शाळेच्या बसमध्ये किंवा त्यांना ने-आण करणाऱ्या व्हॅन वा रिक्षामध्ये वाया जात असतो. या रिक्षा खचाखच भरलेल्या असतात. मुले भाजी किंवा कपडे कोंबून भरावे तशी भरलेली असतात. आतमध्ये घुसमटायला होते. उकाडा असह्य होतो. पण मुले सहन करतात. हा त्रास नसता तर मुले मैदानांवर अधिक काळ खेळू शकली असती. पुस्तके वाचू शकली असती. पण ते होत नाही. एखादा अपघात होऊन चार लोक मेले तर त्यांच्याबद्दल पंतप्रधानांपासून सगळे जण शोक व्यक्त करून पाच-दहा लाख रुपये जाहीर करतात. त्यातही अशा बातम्यांमध्ये एकवेळ या माणसांची नावे छापलेली नसतील, पण हा शोक आणि ही मदत हमखास छापलेली असते. थोडक्यात माणसे अपघातात मेली तरच त्यांना या देशात थोडीफार किंमत येते. पण ती जिवंत असताना रस्त्यावर त्यांचे हजारो तास खोळंब्यात वाया जातात तेव्हा त्यांची कोणालाही काहीही किंमत नसते. वरळीमध्ये त्या महिलेने तक्रार केली त्याच्या बातम्या झाल्या. पण भाजपच्या अशा कित्येक आंदोलनांपायी, मोर्चांपायी, नोटा रद्द केल्या तेव्हा बँकातल्या रांगांपायी आणि कोविडची टाळेबंदी लावली तेव्हा घरी जाण्यासाठी मैलोगणती पायी जाण्यापायी या देशातील कोट्यवधी लोकांनी जे तास वाया घालवले आहेत त्याबद्दल कोण जाब विचारणार आणि कोण उत्तर देणार?

**विचार**

# लॉजिस्टिक क्षेत्रात संरचनात्मक बदल

***भारताच्या लॉजिस्टिक्स क्षेत्रात सध्या संरचनात्मक बदल घडत आहे. धोरणात्मक सुधारणा, सातत्यपूर्ण पायाभूत गुंतवणूक आणि उत्पादन, शेती, किरकोळ व्यापार तसेच ई-कॉमर्स क्षेत्रातील वाढत्या मागणीतून हा बदल आकार घेत आहे. 'नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी', 'पीएम गतीशक्ती' समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर आणि मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी'वरील गुंतवणुकीमुळे लॉजिस्टिक्स क्षेत्र अधिक सुसंगत आणि कार्यक्षम होत आहे.***

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताच्या बदलत्या परिदृश्यात वेअरहाऊसिंग म्हणजेच साठवणूक व्यवस्था ही केवळ पूरक सुविधा राहिलेली नाही, तर संपूर्ण पुरवठा साखळीची मध्यवर्ती कडी बनली आहे. पूर्वी गोदामे म्हणजे वस्तू ठेवण्याची जागा एवढ्यापुरती मर्यादित समज होती; मात्र आज ती इन्व्हेंटरी व्यवस्थापन, खर्च नियंत्रण, वितरण कार्यक्षमता आणि सेवा गुणवत्तेचा मुख्य आधार बनली आहेत. त्यामुळे वेअरहाऊसिंगचा विस्तार हा केवळ पायाभूत वाढ नसून आर्थिक व्यवस्थेतील गुणवत्ताबदलाचा संकेत आहे. शेतीक्षेत्रात या बदलाची विशेष झलक दिसते. अन्नधान्य उत्पादनात झालेली वाढ, सरकारी खरेदीचा विस्तार आणि वैज्ञानिक साठवणुकीवर दिला जाणारा भर यामुळे आधुनिक गोदामे आणि 'सिलो' पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. भारताच्या अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. अन्नधान्याची खरेदी, साठवणूक आणि वितरण यामधील सुसूत्रता टिकवून ठेवण्यासाठी मजबूत वेअरहाऊसिंग प्रणाली अपरिहार्य ठरते. नोव्हेंबर २०२५ पर्यंत केंद्र सरकारच्या अन्नधान्य साठ्यासाठी सुमारे ९२ दशलक्ष टन क्षमतेची साठवणूक व्यवस्था उभी करण्यात आली आहे. यामध्ये सुमारे ८२ दशलक्ष टन संरक्षित साठवणूक आणि उर्वरित 'सीएपी' स्वरूपातील साठवणूक समाविष्ट आहे. 'फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' (एफसीआय) आणि राज्य सरकारी संस्था यामध्ये प्रमुख भूमिका बजावत आहेत, तर 'सेंट्रल वेअरहाऊस कॉर्पोरेशन' आणि राज्य वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन्स संचालनात मदत करतात. 'एफसीआय'ने एकट्यानेच सुमारे ४८ दशलक्ष टन साठवणूक क्षमता उभारली असून त्याचा वापर जवळपास ८८ टक्के आहे. हे प्रमाण खरेदी आणि साठवणूक यांच्यातील समन्वय दाखवते.

आज 'एफसीआय'च्या सुमारे ६७ टक्के साठवणूक सुविधा भाडेतत्त्वावर आहेत. यामुळे पीक हंगामातील वाढत्या गरजेनुसार लवचिकता मिळते आणि भांडवली खर्च कमी राहतो. उत्तर भारतात या साठवणुकीचे सर्वाधिक प्रमाण आढळते. तिथे गहू आणि तांदूळ खरेदी मोठ्या प्रमाणावर होते. राज्यस्तरीय यंत्रणाही या व्यवस्थेत तितक्याच महत्त्वाच्या आहेत. राज्य वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन्स आणि इतर संस्थांकडे मिळून सुमारे ४३ दशलक्ष टन साठवणूक क्षमता आहे. पश्चिम आणि उत्तर भागात याचे प्रमाण अधिक असून उत्पादन आणि उपभोग या दोन्ही दृष्टिकोनांमधून महत्त्वाचे आहे. याशिवाय 'सेंट्रल वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन'कडे ७४१ गोदामे असून त्यांची एकूण क्षमता सुमारे १५ दशलक्ष टन आहे. रेल्वे संलग्न गोदामे, कंटेनर फ्रेट स्टेशन, इनलँड कंटेनर डेपो आणि तापमान नियंत्रित सुविधा यामुळे या नेटवर्कची कार्यक्षमता वाढते. या साऱ्या विस्तारासोबतच नियमन आणि पारदर्शकतेतही मोठी सुधारणा झाली आहे. 'वेअरहाऊस डेव्हलपमेंट अँड रेग्युलेटरी ऑथॉरिटी'च्या चौकटीमुळे वेअरहाऊसिंग क्षेत्र अधिक संघटित झाले आहे. सप्टेंबर २०२५ पर्यंत १०,८०० हून अधिक गोदामे नोंदणीकृत झाली असून ७.३ लाखांहून अधिक वेअरहाऊस रिसीट्स जारी करण्यात आल्या आहेत. या प्रणालीमुळे शेतकरी, व्यापारी आणि कृषी उद्योगांना औपचारिक कर्जप्रवाह उपलब्ध झाला आहे. ते ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी एक मोठे सकारात्मक पाऊल आहे. औद्योगिक आणि ई-कॉमर्स क्षेत्रातही वेअरहाऊसिंगची भूमिका झपाट्याने बदलत आहे.

आज तृतीय पक्ष लॉजिस्टिक्स, ओम्नीचॅनल विक्री आणि 'क्विक कॉमर्स'च्या वाढत्या ट्रेंडमुळे दर्जेदार (ग्रेड ए) गोदामांची मागणी वाढत आहे. विशेषतः टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये या सुविधांचा विस्तार होत आहे. ते प्रादेशिक संतुलनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्याच वेळी कोल्ड चेन क्षेत्रही धोरणात्मकदृष्ट्या अधिक महत्त्वाचे ठरत आहे. अन्नधान्याची नासाडी कमी करणे, औषध आणि लसींच्या पुरवठा साखळीला बळकटी देणे आणि नाशवंत वस्तूंच्या निर्यातीला चालना देणे या सर्व बाबींसाठी मजबूत कोल्ड स्टोरेज नेटवर्क आवश्यक आहे. त्यामुळे वेअरहाऊसिंगचा हा भाग केवळ आर्थिक नव्हे, तर सार्वजनिक आरोग्य आणि अन्नसुरक्षेशीही जोडला गेला आहे. या सर्व घडामोडींचा एकत्रित विचार केल्यास स्पष्ट होते, की भारतातील वेअरहाऊसिंग क्षेत्र हे आता अर्थव्यवस्थेच्या पाठीचा कणा बनत आहे; मात्र या प्रगतीसोबत काही आव्हानेही आहेत, जसे की तंत्रज्ञानाचा व्यापक वापर, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि खासगी गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे. भारतातील वेअरहाऊसिंग क्षेत्रात घडणारा बदल आता केवळ विस्तारापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर गुणात्मक परिवर्तनाकडे झेपावू लागला आहे. पारंपरिक गोदामांच्या पलीकडे जाऊन आधुनिक साठवणूक प्रणाली, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि शाश्वततेकडे झुकणारे धोरणात्मक निर्णय यामुळे हे क्षेत्र नव्या टप्प्यावर पोहोचत आहे. या प्रक्रियेत सिलो साठवणूक, ग्रेड-ए औद्योगिक वेअरहाऊसिंग, 'कोल्ड चेन नेटवर्क' आणि 'ईएसजी' आधारित मॉडेल्स ही चार प्रमुख प्रवाह ठळकपणे दिसून येतात.

पारंपरिक गोदामे अजूनही भारताच्या कृषी साठवणूक व्यवस्थेचा कणा आहेत; मात्र सिलो प्रणाली आता एक प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहे. विशेषतः गहू साठवणुकीसाठी सिलो अधिक कार्यक्षम ठरत आहेत. पारंपरिक गोदामांमध्ये पाच ते दहा टक्क्यांपर्यंत धान्याची हानी होत असताना सिलोमध्ये ती एक टक्क्यांपेक्षा कमी राहते. याशिवाय कमी जागेत अधिक साठवणूक, यांत्रिक हाताळणी आणि अचूक इन्व्हेंटरी नियंत्रण ही सिलो यंत्रणेची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. २०२५ च्या मध्यापर्यंत सुमारे तीन दशलक्ष टन सिलो क्षमता कार्यान्वित झाली असून, त्याच प्रमाणात प्रकल्प बांधकामाधीन आणि निविदा प्रक्रियेत आहेत. पंजाब, हरियाणा आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये याचा सर्वाधिक विस्तार दिसतो, जे त्यांच्या गहू उत्पादनातील महत्त्व दर्शवते. या क्षेत्रात 'एफसीआय'ची भूमिका महत्त्वाची आहे. 'एफसीआय'कडे असलेल्या सिलो क्षमतेपैकी बहुतांश क्षमता सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलवर आधारित आहे. अदानी ॲग्री लॉजिस्टीक, स्नोमॅन लॉजिस्टिक आणि नॅशनल बल्क बँडलिंग कार्पोरेशन यांसारख्या खासगी कंपन्यांनी या क्षेत्रात तांत्रिक कौशल्य आणि कार्यक्षमतेची नवी पातळी आणली आहे. रेल्वे आणि रस्ते आधारित सिलो मॉडेलमुळे धान्याची जलद वाहतूक आणि कमी नुकसान शक्य होत आहे. औद्योगिक वेअरहाऊसिंग क्षेत्रातही गेल्या दशकात मोठा बदल घडून आला आहे. जागतिक दर्जाच्या ग्रेड-ए सुविधांकडे झुकणारा हा कल स्पष्टपणे दिसतो. २०२५ मध्ये अव्वल शहरांमध्ये २६.५ दशलक्ष चौरस फूट एवढी विक्रमी मागणी नोंदली गेली. ती मागील वर्षाच्या तुलनेत ११ टक्क्यांनी अधिक आहे. दिल्ली-एनसीआर, चेन्नई आणि मुंबई या शहरांनी या वाढीत आघाडी घेतली असून तृतीय पक्ष लॉजिस्टिक्स, अभियांत्रिकी आणि ई-कॉमर्स क्षेत्रातील कंपन्या प्रमुख मागणीदार ठरल्या आहेत. विशेष म्हणजे ई-कॉमर्स क्षेत्रातील मागणी तब्बल अडीचपट वाढली आहे. या वाढीमागे उत्पादनवाढीस चालना देणाऱ्या धोरणांचा मोठा वाटा आहे. 'प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह स्कीम', एक्सप्रेसवे आणि मालवाहतूक कॉरिडॉरभोवती होणारा विकास, तसेच पुरवठासाखळीचे विकेंद्रीकरण या सर्व घटकांमुळे टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये वेअरहाऊसिंगचा विस्तार होत आहे. स्वस्त जमीन, कमी खर्च आणि ग्राहकांच्या जवळ असणे या फायद्यांमुळे ही शहरे भविष्यातील केंद्रबिंदू बनत आहेत. कोल्ड स्टोरेज आणि तापमान नियंत्रित वाहतूक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण प्रगती होत आहे. २०२५ पर्यंत भारतात ४० दशलक्ष मेट्रिक टनांहून अधिक क्षमता निर्माण झाली असून ८,८०० पेक्षा जास्त सुविधा कार्यरत आहेत. एकाच वस्तूऐवजी बहुवस्तू साठवणूक आणि एकात्मिक कोल्ड चेनकडे कल वाढत आहे. सरकारच्या योजनांमुळे ३९५ एकात्मिक प्रकल्पांना मंजुरी मिळाली असून त्यापैकी बहुतेक कार्यान्वित झाले आहेत. लॉजिस्टिक्सच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. ऑटोमेशन, रोबोटिक्स, वेअरहाऊस मॅनेजमेंट सिस्टीम्स आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया यामुळे साठवणूक व्यवस्थापन अधिक अचूक आणि जलद होत आहे.

यासोबतच शाश्वततेकडेही विशेष लक्ष दिले जात आहे. 'नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी'अंतर्गत ग्रीन लॉजिस्टिक्सवर भर देण्यात आला असून सौरऊर्जा, ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना, पावसाचे पाणी साठवण आणि पुनर्वापर यांसारख्या उपाययोजना नव्या वेअरहाऊसिंग प्रकल्पांमध्ये समाविष्ट केल्या जात आहेत. 'ईएसजी' निकषांनुसार उभारलेली गोदामे आता गुंतवणूकदार आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांसाठी अधिक आकर्षक ठरत आहेत. याचबरोबर 'बिल्ट-टू-सूट' (बीटीएस) मॉडेलही वेगाने पुढे येत आहे. मोठ्या कंपन्या आपल्या गरजेनुसार सानुकूलित वेअरहाऊस उभारण्याला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे कार्यक्षमतेत वाढ आणि दीर्घकालीन स्थैर्य मिळते. उत्पादन केंद्रे आणि नव्याने विकसित होणाऱ्या बाजारपेठांमध्ये या मॉडेलचा विस्तार होत आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारताच्या वेअरहाऊसिंग क्षेत्राचे भवितव्य अत्यंत आशादायक दिसते. २०३० पर्यंत कृषी साठवणूक क्षमता ३९० दशलक्ष टनांहून अधिक होण्याची शक्यता आहे तर सिलो क्षमता दहापट वाढून सुमारे ३० दशलक्ष मेट्रिक टनांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. कोल्ड चेन बाजाराचा आकारही १३.५ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एकूणच, भारतातील वेअरहाऊसिंग क्षेत्र आता केवळ सहाय्यक घटक न राहता अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनत आहे. तंत्रज्ञान, शाश्वतता आणि धोरणात्मक गुंतवणूक यांच्या साहाय्याने हे क्षेत्र अधिक एकात्मिक, कार्यक्षम आणि जागतिक स्पर्धेसाठी सक्षम होत आहे. पुढील काळात हा बदल केवळ लॉजिस्टिक्स क्षेत्रापुरता मर्यादित राहणार नाही, तर भारताच्या संपूर्ण आर्थिक विकासाचा वेग ठरवणारा निर्णायक घटक ठरणार आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

**चर्चा आजची**

# अलिबाग-मुरूड मार्गावर 'चिखल'मय विकास

**संतोष राऊळ**



सध्या अलिबागसह मुरूड तालुक्यात मोठ्या प्रमाणात रस्ता रूंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. तसेच, पाण्याचा निचरा होण्यासाठी ठिकठिकाणी मोऱ्या खणुन ठेवण्यात आल्या आहेत. हे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे अपेक्षित आहे. कारण एकदा का पावसाळा सुरू झाला तर हाच मार्ग अत्यंत धोकादायक होणार असल्याचे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे. त्याचा प्रत्यय नुकताच येथील प्रवासी वर्गाला आला आहे. मंगळवारी (दि.२२) पडलेल्या अवकाळी पावसामुळे अलिबाग तालुक्यातील चौलसह पुढे मुरूडपर्यंत आणि अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्यांवर चिखलाचे साम्राज्य उभे राहिले होते. त्यामुळे प्रशासनातर्फे चालू असलेला विकास चिखलात मिसळल्याच्या चर्चा सध्या प्रवासी वर्गातून होत आहे.

अलिबागसह मुरूड तालुक्यात रेवस-रेड्डी अंतर्गत रस्त्याचे नुतनिकरण व काँक्रिटीकरणाचे काम एमएमआरडी आणि एमएसआयडीसी तर्फे जोरदार सुरू आहे. त्यासाठी ठिकठिकाणी रस्ते खोदून ठेवण्यात आले आहेत. पाण्याचा निचरा होण्यासाठी मोऱ्या देखील खोदून ठेवण्यात आल्या आहेत. यापूर्वी या मोरीच्या खड्ड्यात एकाचा नाहक बळी गेला होता. तरी देखील प्रशासनाला जागा आली नसल्याचे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे. कारण मंगळवारी पडलेल्या अवकाळी पावसामुळे या नव्याने काँक्रिटीकरण केलेले रस्ते चिखलमय झाले होते. या रस्त्यांच्या कडेलाच मातीचे ढिगारे करून ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे काही ठिकाणी पाण्याचा नैसर्गिक निचरा होण्याच्या मार्गात अडथळा आणि ते पाणी मातीसह रस्त्यावर आले. यावर कोणी सर्वसामान्याने आवाज उठवला असता, 'विकास कामे होताना असे होणारच. किंवा विकासाला विरोध करणं चुकीचं आहे', असे बोलून रोखले जात आहे. परंतु, सद्यपरिस्थिती पाहता लोकप्रतिनिधी देखील या अशा चिखलमय विकासातून जाताना चारवेळा विचार करेल.

त्यामुळे अवकाळी पावसातच प्रशासनाचा फज्जा उडला आहे. जिल्ह्याचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. सर्वसामान्यांना विचारात घेऊन त्यांच्या सोयीनुसार विकास करणे सर्वांचेच भल्याचे. परंतु, नियोजन शुन्य विकास सध्या जीवघेणा ठरत आहे. जोपर्यंत एखाद्याचा जीव जात नाही तोपर्यंत प्रशासन जागे होत नाही, असा संताप प्रवासी वर्गातून उमटत आहे. अवकाळी पावसातच अलिबाग-मुरूड मार्गावरील चौल व मुरूडमधील रस्त्याचा चिखल झाला आहे. पावसाळी हंगाम सुरू झाल्यावर या मार्गावरील पावसाळ्यात बहुचर्चित असणाऱ्या कुरूळ-बेलकडे या रस्त्याचे काय हाल होतील, अशी चिंता सर्वसामन्यांसह प्रवासी वर्गाला पडला आहे. प्रशासनाने पावसाळ्यातही रस्त्याची कामे सुरू ठेवली तरी त्याचा नाहक त्रास प्रवासी वर्गाला भोगावा लागणार आहे.

अशीच परिस्थती संपुर्ण जिल्ह्यात आहे. दरवर्षी पावसाळ्यापुर्वी रस्ता कितीही सुस्थितीत असला तरी तो पावसाळ्यात चिखलात आणि खड्ड्यात हरवला जातो. संबंधित प्रशासनाला याबाबत दरवर्षीचा अनुभव असूनही त्यांच्याकडून कोणतेही पुर्व नियोजन केले जात नाही. त्यातच ठिकठिकाणी रस्त्यांची कामे सुरू असून प्रशासनाच्या नियोजन शुन्य कारभारमुळे त्याचा नाहक त्रास स्थानिकांसह पर्यटक व प्रवासी वर्गाला बसत आहे. अवकाळी पावसातच अलिबाग-मुरूड रस्त्यावरील चिखलमय विकासाचा अनुभव पहायला मिळाला. अजुनही संबंधित प्रशासन निद्रावस्थेत राहिले तर सध्याचा चिखलमय विकास जीवघेणा विकास व्हायला वेळ लागणार नाही, अशी चर्चा चोर धरत आहे.

**दिनविशेष**


# जागतिक पुस्तक दिन

आज २३ एप्रिल, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गार्सीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील. **– श्याम बसप्पा ठाणेदार, ठाणे**

**विशेष**

# शेतकरी चळवळीतील एक रत्न

**जयंत पाटील**
**सरचिटणीस, शेकाप.**



अलिबाग तालुक्यातील खारेपाट परिसरात नाना पाटील यांनी उभारलेली कार्यकर्त्यांची पिढी ही शेतकरी चळवळीची खरी ताकद आहे. सुरवातीपासूनच त्यांनी तयार केलेले शिक्षक म्हणजेच त्या पिढीतले एक निष्ठावान, जिद्दी आणि प्रामाणिक व्यक्तिमत्त्व म्हणजे बहिरीच्या पाड्यातील दिना मास्तर. दिना गुरूजींनी स्व. नाना पाटील, स्व. प्रभाकर पाटील, स्व. ॲड. दत्ता पाटील यांच्यासोबत काम केले. आयुष्यभर शेतकरी चळवळ आणि शेकापसाठी तन-मन-धन अर्पण केले. नाना पाटील, प्रभाकर पाटील, दत्ता पाटील यांच्यासारख्या नेत्यांसोबत काम करत असताना पोलादपूर, पनवेल, खालापूर, श्रीवर्धन अशा विविध ठिकाणी शिक्षक म्हणून सेवा बजावली. शिक्षक म्हणून काम करताना त्यांनी केवळ शिक्षण देण्यापुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही, तर गोरगरीब आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी रात्रीचे वर्ग घेऊन शाळांचा विकास करण्याचे काम केले. तसेच त्या-त्या ठिकाणी शेतकरी चळवळ व शेकापची तत्व परिसरात जपली. त्यांच्या कार्यात कधीही स्वार्थ नव्हता. बदलीसाठी पक्ष नेतृत्वाकडे आग्रह नव्हता, पदासाठी अपेक्षा नव्हती, फक्त काम आणि संघटनेप्रती निष्ठा होती. स्वतःच्या खिशातून खर्च करून संघटनेचे काम करणारा हा हाडाचा कार्यकर्ता होता. ज्या ध्येयाने ते काम करीत होते, ते ध्येय त्यांनी कधी सोडले नाही. आपल्या घराण्यातील मुले पक्षासोबत कशी राहतील, याची शिकवण व जबाबदारीची जाणीव आजही त्यांच्या मुलांमध्ये दिसते.

खारेपाटातील नाना पाटील यांच्या सहकाऱ्यांमध्ये श.मी. पाटील, कृष्णा भाऊजी, पवार शेठ, रामभाऊ पाटील अशा अनेक सहकाऱ्यांबरोबर दिना गुरूजींना काम करण्याची संधी मिळाली. त्यावेळच्या संघ वातावरणातील राजकारण जवळून बघण्याची संधी मला मिळाली.

आपल्यानंतर पाटील बंधूंनी जे काम केले, त्या कामात या माणकुळे पंचायतीच्या ३ गावांमध्ये गोरगरीबांची कामे करण्यात दिना गुरूजी अग्रेसर असायचे. स्वखर्चाने, पदरमोड करुन काम करणारा हाडाचा कार्यकर्ता आज खऱ्या अर्थाने आपल्यातून निघून गेला. अशा या निष्ठावंत कार्यकर्त्याला खारेपाट कधीही विसरणार नाही. मी स्वतः गेली ३०-४० वर्षे पक्षात काम करत असताना दिना गुरूजींचा सहवास लाभला. पक्षाच्या माध्यमातून ज्या-ज्या पदावर काम करण्याची संधी मिळाली, त्या-त्या क्षणी दिना गुरुजींसारखे कार्यकर्ते सोबत होते. त्यांच्या कार्यातूनच प्रेरणा घेतली आणि म्हणूनच त्यांना मी कधीही विसरणार नाही.

व्यस्त कामकाजामुळे वारंवार भेट होत नव्हती. पण अलिकडच्या निवडणुकीत त्यांची भेट घेतली होती. त्यावेळी काही थोड्याच वेळासाठी येणार असल्याचे मी कळविले होते. मात्र आमच्यात १ तास चर्चा केली, आढावा घेतला. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरचं तेज, विचारांतील स्पष्टता आणि शेवटपर्यंतची बांधिलकी पाहून मन भारावून गेलं. हे करीत असताना त्यांच्या डॉक्टर चिरंजीव व त्याच्या पत्नीला धन्यवाद केले. त्यांनी उत्तमप्रकारे गुरुजींचा सेवा केल्याचे मी पाहिले आणि समाधान वाटले.

त्यांची तब्येत खूप चांगली होती, ते पाहून आनंद झाला. गुरुजींचे आयुष्य वाढेल, अशी मी सहकाऱ्यांसोबत चर्चाही केली. पण मरण माणसाला आधीच कळतं असं म्हणतात, त्यावर विश्वास बसायला लागला आहे. त्यांच्या तब्येतीत सुधारणा होईल असं वाटत असतानाच अचानक आलेल्या बातमीने मन सुन्न झालं. परदेशात असताना हा धक्का बसला आणि डोळ्यासमोर त्यांचा तेजस्वी चेहरा उभा राहिला.

शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी आपली बांधिलकी जपली. त्यांच्या कुटुंबियांनी, विशेषतः डॉक्टर चिरंजीव आणि सुनेने केलेली सेवा कौतुकास्पद होती. त्यांच्या तब्येतीत सुधारणा होईल असं वाटत असतानाच अचानक आलेल्या बातमीने मन सुन्न झालं. परदेशात असताना हा धक्का बसला आणि डोळ्यासमोर त्यांचा तेजस्वी चेहरा उभा राहिला. आज समाजात आणि राजकारणात अशा निस्वार्थी, त्यागी कार्यकर्त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवते. स्वतःच्या खिशातून खर्च करून, कोणतीही अपेक्षा न ठेवता काम करणारा कार्यकर्ता पुढच्या पिढीला प्रेरणा देणारा आहे. मी कधी खचलो तरी पुन्हा उभं राहण्याची स्फूर्ती दिना गुरुजींमुळे मिळते. अडचणीच्या काळात पुन्हा उभं राहण्याची ताकद त्यांनी दिली. समाजाप्रती त्यांची निष्ठा, त्याग आणि समाजसेवेची वृत्ती पुढच्या पिढीला समजावी, असे कार्यकर्ते निर्माण व्हावे, या अपेक्षेने हा लेख लिहिला असून अशा निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या कार्याला लाल सलाम...

# ई-कचरा पर्यावरणासाठी एक गंभीर आव्हान

**लायन्स क्लब अलिबाग ही सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, पर्यावरण विषयात काम करणारी संस्था असून मागील ५२ वर्ष अलिबागमध्ये कार्यरत आहे. या संस्थेअंतर्गत १९ एप्रिल ते २६ एप्रिल पर्यावरण आठवडा साजरा केला जात आहे. या अंतर्गत आपण पर्यावरणविषयक अनेक विषय हाताळत असून इलेक्ट्रॉनिक टाकाऊ वस्तू जमा करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे हे काम हाती घेतले आहे. अलिबाग नगरपालिका यामध्ये सहभागी असून त्यांच्या सहकाऱ्याने आपण हे काम सुरू केले आहे.**



प्रदीप नाईक

आज E-Waste म्हणजे टाकाऊ, खराब झालेली, जुनी किंवा न वापरता येणारी इलेक्ट्रॉनिक उपकरणे (कचरा) ही जगासाठी फार मोठी समस्या बनली आहे. तो पर्यावरणासाठी फार मोठा धोका ठरत आहे. भारत कचरा निर्माण करणारा जगातील तिसरा देश आहे. एवढा मोठा ई-कचरा निर्माण होत असेल आणि त्याची योग्य विल्हेवाट लावली गेली नाही, तर भविष्यात आपल्या देशासाठी तो पर्यावरणाला फार मोठा धोका ठरू शकतो.

आज प्रत्येक घरात मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप, संगणक, फ्रिज, चार्जर, वॉशिंग मशीन अशी अनेक साधने सर्वसाधारणपणे वापरली जातात. तंत्रज्ञान दिवसागणिक बदलत असते, त्यातून बदललेल्या तंत्रज्ञानाच्या आधुनिक वस्तू खरेदीकडे जनतेचा कल असतो, त्यातून जुन्या वस्तूंच्या रूपाने कचरा बाढत असतो. संयुक्त राष्ट्राच्या २०२४ च्या अहवालानुसार प्रतिवर्षी ६.२ करोड टन ई-कचरा तयार होत असतो. त्यातील फक्त २२ टक्के इलेक्ट्रॉनिक कचरा रिसायकल होतो. याचाच अर्थ उर्वरित सर्व कचरा पर्यावरणाला घातक ठरत असतो आणि हीच आजची गंभीर समस्या आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे भारत यामध्ये तिसऱ्या क्रमांकावर असल्याने आपल्या देशासाठी इलेक्ट्रॉनिक कचरा व्यवस्थापन हा फार महत्वाचा विषय ठरत आहे. २०२४-२५ मध्ये भारतामध्ये १४ लाख टन ई-कचरा निर्माण झाला जो २०२३-२४ पेक्षा ११ टक्क्यांनी अधिक होता. मागील पाच वर्षामध्ये यात ७० टक्के वाढ झाली आहे, यातून या प्रश्नाची गंभीरता लक्षात येते.

ई-कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावू शकलो नाही तर हा कचरा हवा, पाणी, मातीमध्ये मिसळून कॅन्सर, किडनी, किंवा मेंदूविषयक आजाराला कारणीभूत ठरतात. कारण यात शिसे, पारा, cadnium, आर्सैनिक असे अनेक विषारी घटक असतात. ग्रामीण तसेच शहरी भागातही अनेक ठिकाणी इलेक्ट्रॉनिक कचरा जाळला जातो, जे फारच घातक असते.

भारतामध्ये E-Waste मॅनेजमेंट rules २०२२ लागू केले असून त्या अंतर्गत उत्पादकांना जुन्या वस्तू परत घेणे बंधनकारक असून अधिकृतपणे त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था आहे. परंतु, आजही उत्पादक अथवा विक्रेते तसेच ग्राहकही याबाबत गंभीर नाहीत. एमच पर्यावरणासाठी फार मोठे गंभीर संकट बनू नये, यासाठी सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, व्यापारी, उत्पादक, ग्राहक या सर्वांनीच समजदारीने जबाबदारी ओळखून काम करण्याची गरज आहे. एक मोबाईल योग्य ठिकाणी रिसायकल झाला तर त्यातील ८० टक्के धातू परत वापरता येतो. या छोट्याशा उदाहरणावरून जागृत नागरिक पर्यावरणाला कसा हातभार लाऊ शकतो हे सिद्ध होते.

जर हेच घटक जमिनीत मिसळले तर जमीन नापीक बनते. परंतु, भारत देशामध्ये आजही बहुतांश कचरा अनौपचारिक पद्धतीने जाळला जातो किंवा त्याची विल्हेवाट लावली जाते, ज्यामुळे हवेत विषारी घटक सोडले जातात. याबाबत पुरेशी जागृतता निर्माण करणे सरकार, सामाजिक संस्थांची जबाबदारी आहे, आपण यासाठी खालील गोष्टी करू शकतो.

इलेक्ट्रॉनिक कचरा अधिकृत ई-वेस्ट संकलन केंद्रात जमा करावा, जेथे त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली जाईल. शक्यतो नवीन उपकरणे सहजपणे विकत घेण्याऐवजी लोकांना जुनी उपकरणे दुरुस्त करून वापरण्यास प्रवृत्त करणे गरजेचे आहे. नवीन उपकरणे खरेदी करताना ती मान्यताप्राप्त हमीसह टिकाऊ असल्याची खात्री करून घेणे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून जसा ओला, सुका कचरा वेगळा केला जातो किंवा जैव वैद्यकीय कचरा जसे स्वतंत्र संकलित केले जाते. त्याप्रमाणे E Waste सुद्धा स्वतंत्रपणे संकलित करून ते योग्यप्रकारे रिसायकल करण्यावर लक्ष देणे आवश्यक आहे. सर्वांनी जबाबदारीने काम केले तर या जागतिक समस्येला तोंड देणे सहज शक्य आहे.

भारताने या विषयाची गंभीरता ओळखून फार महत्वाची पावले उचलली आहेत. आज ७० टक्केपेक्षा जास्त ई-कचरा रिसायकल करण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे. तरीसुद्धा ३० टक्के भाग सुद्धा फार मोठा धोका पर्यावरणाला पोहचवू शकतो. म्हणूनच लायन्स क्लबसारख्या संस्थानी अशा प्रश्नांची गंभीरता ओळखून याकामी पुढाकार घेणे कौतुकास्पद आहे. अलिबाग नगरपरिषदेने त्यात समाविष्ट होणे म्हणजे दुधात साखर. आज आपण फक्त सप्ताह साजरा करीत असलो तरी भविष्यात अलिबाग नगरपालिकेच्या सहकाऱ्याने कायम स्वरूपी केंद्र उभारण्याचा आपला प्रयत्न असेल, फक्त सुजाण अलिबागकरांनी यात सहभागी होणे आवश्यक आहे.

**अध्यक्ष, लायन्स क्लब अलिबाग**

---

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२३ एप्रिल
१) श्रीम.अनुप्रिता अनंत खैरे
ब्राम्हणआळी, अलिबाग
दि.२३-४-१९५३
२)श्री.प्रमोद दत्तात्रेय पाथरे
मु.कुरूळ, अलिबाग
दि.२३-४-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. विनोदकुमार वल्लभदास जागाणी, स्मरणार्थ, रेवसगाव, अलिबाग**



**श्रीमती मंजुला भरत जैन, गृह प्रवेश निम्मित, अलिबाग**

**मधुबाला व मुकेश जैन, अलिबाग**

## सर्व्हिस सेंटरमध्ये वाहन धुण्यावर निर्बंध

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

शहरातील वाढत्या उष्णतेमुळे पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. पाणीटंचाई टाळण्यासाठी शहरातील सर्व सर्व्हिस सेंटरमध्ये वाहन धुणे व इतर साफसफाईच्या कामांवर १० जूनपर्यंत निर्बंध घालण्यात आले असून नागरिकांनी याबाबत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या तीव्र उन्हामुळे धरणांतील पाणीसाठा तसेच शहरातील विहिरी व कूपनलिकांची पाणीपातळीही खालावली आहे. या परिस्थितीत नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी केले आहे. पाणी बचतीसाठी प्रभावी उपाययोजना म्हणून सर्व्हिस सेंटरमध्ये दोन, तीन व चार चाकी वाहनांसह इतर वाहनांचे धुणे आणि साफसफाई तात्पुरती बंद करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या आहेत.

## अग्निशमन सप्ताहाचा समारोप समारंभ

**। उरण । प्रतिनिधी ।**



ओएनजीसी उरण, द्रोणागिरी बिल्डिंग येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये सोमवारी (दि.२०) अग्निशमन सेवा सप्ताहाचा समारोप सोहळा आयोजित करण्यात आला होता.

जीजीएम/प्लांट मॅनेजर एस.एन. अहमद यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सीजीएम (सपोर्ट मॅनेजर) संजीव मोहन, सीजीएम (एचएसई) शरद सोनकर, सीजीएम (पी) अर्चना श्रीवास्तव, सीजीएम (पी) एच.एस. साहू, जीएम, ओएनजीसी फायर सर्व्हिस, सीआयएसएफ युनिट ओएनजीसी मुंबईचे उप कमांडंट/फायर लोकेश चंद यांच्यासह इतर प्लांट अधिकारी, सीआयएसएफ कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ओएनजीसीच्या गीताने झाली. त्यानंतर अग्निशमन सेवा सप्ताहादरम्यान आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांवर प्रकाश टाकणारे पॉवरपॉइंट सादरीकरण करण्यात आले. यामध्ये उद्घाटन सोहळा, शाळा, रुग्णालये, सीआयएसएफ कॉलनी आणि जवळच्या गावांमध्ये आयोजित अग्निसुरक्षा प्रशिक्षण सत्रे, तसेच ओएनजीसी कर्मचारी, सीआयएसएफ कर्मचारी आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धांच्या विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना संबोधित केले आणि अग्निसुरक्षा जागृतीला प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

## निवडक

### कौटुंबिक वादातून पत्नीची हत्या




**पालघर :** विरारमधील वर्दळीच्या ग्लोबल सिटी परिसरात एका महिलेची तिच्याच पतीने दुसऱ्या पत्नीच्या मदतीने निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. आरती (३०) असे मृत महिलेचे नाव असून, याप्रकरणी बोळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विरार पश्चिम येथील ग्लोबल सिटी, एकता पार्क परिसरातील कल्पवृक्ष सोसायटीच्या इमारतीचे बांधकाम सध्या सुरू आहे. याच इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील एका खोलीत (लेबर रूम) मृत आरती तिचे पती मुन्ना आणि त्याच्या दुसऱ्या पत्नीसोबत राहत होती. प्राथमिक माहितीनुसार, कौटुंबिक वादातून ही हत्या झाली असावी, असा संशय आहे. आरोपी पती मुन्ना आणि त्याची दुसरी पत्नी मिरा यांनी संगनमत करून आरतीला बेदम मारहाण केली. यावेळी तिचे डोके भिंतीवर जोरात आदळल्याने गंभीर दुखापत होऊन आरतीचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी मुन्ना आणि मीरा दोघेही घटनास्थळावरून फरार झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच बोळींज पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा केला आणि तो शवविच्छेदनासाठी पाठवला. इमारतीचे कंत्राटदार श्रीराम गोपीराम गुजर यांनी यासंदर्भात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून फरार आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना केली आहेत.



### सायबर चोरट्याकडून लाखोंची फसवणूक

**रत्नागिरी :** राजापूर शहरातून ऑनलाईन फसवणुकीची घटना समोर आली आहे. सायबर चोरट्यांनी शहरातील एका प्रतिष्ठित नागरिकाला आपले लक्ष्य बनवत त्यांच्या बँक खात्यातून तब्बल ३ लाख रुपये लंपास केले आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित नागरिकाच्या व्हॉट्सअँप नंबरवर एका अज्ञात क्रमांकावरून एक संशयास्पद लिंक पाठवण्यात आली होती. कोणतीही शंका न येता किंवा माहिती नसताना, संबंधित व्यक्तीने ती लिंक उघडली. लिंकवर क्लिक करताच काही क्षणांच्या आतच त्यांच्या बँक खात्यातून ३ लाख रुपये वळते झाल्याचे समोर आले. खात्यातून पैसे कपात झाल्याचा मेसेज मोबाईलवर आला. आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच पीडित नागरिकाने तात्काळ राजापूर पोलीस ठाण्यात धाव घेत आपली तक्रार नोंदवली. पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### मराठी माषेचे अध्यापन सक्तीचे

**रत्नागिरी :** राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व मंडळांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी माषेचे अध्यापन सक्तीचे असतानाही, अनेक शाळा या नियमाचे उल्लंघन करत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आता आक्रमक पाऊल उचलले असून, मराठी भाषा अनिवार्य न करणाऱ्या शाळांवर थेट टाळे ठोकण्याची किंवा त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची कठोर कार्यपद्धती निश्चित केली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भात १७ एप्रिल रोजी महत्त्वपूर्ण शासन निर्णय निर्गमित केला आहे. राज्यात २०२० पासूनच मराठी भाषा सक्तीचा कायदा लागू झाला आहे, मात्र विशेषतः खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळामध्ये याकडे दुर्लक्ष होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. नव्या नियमावलीनुसार, प्रत्येक शाळेला आता मराठी विषयासाठी विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त शिक्षकाची नियुक्ती करणे अनिवार्य असेल. शाळा सुरू झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत या धोरणाची अंमलबजावणी होत आहे की नाही, याची तपासणी शिक्षण उपसंचालकांमार्फत केली जाईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांना प्रथम नोटीस दिली जाईल आणि त्यांना १५ दिवसांत आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळेल. जर शाळेचा खुलासा समाधानकारक नसेल, तर विभागीय शिक्षण उपसंचालक व्यवस्थापनाला १ लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावू शकतात. केवळ दंड मरून शाळांना सुटका मिळणार नाही, तर त्यांना चालू किंवा आगामी शैक्षणिक संबंधित शाळा वर्षापासून मराठी विषयाचे अध्यापन सुरू करण्याचे आदेश दिले जातील.

## सहकारी संस्थांचे प्रशिक्षण शिबीर

**मुंबई :** मुंबई कोकण विभागीय मजूर सहकारी संघातर्फे शुक्रवार दि.२४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते २.३० या वेळेत सहकारी संस्थांचे प्रशिक्षण शिबीर पार पडणार आहे. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आ.प्रविण दरेकर असतील. दादर (पूर्व) येथील कोहिनूर मंगल कार्यालय येथे होणाऱ्या या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## स्वच्छतेवर अधिकाधिक भर देण्याचे निर्देश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागाच्या सहायक आयुक्तांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील रस्ते स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नाले स्वच्छता, बस थांबे आदी ठिकाणच्या स्वच्छतेकडे अधिक लक्ष देऊन परिसर स्वच्छ ठेवण्यास प्राधान्य द्यावे, अशा सूचना अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगर) डॉ. विपिन शर्मा यांनी दिल्या आहेत.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी सोमवारी (दि.२०) पश्चिम उपनगरांतील एच पूर्व, पी उत्तर आणि पी दक्षिण या विभागांमधील विविध ठिकाणांना आकस्मिक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी विभागांमधील परिसर स्वच्छता आणि नाले स्वच्छतेच्या कामांचा पाहणी केली. त्यानंतर त्यांनी एच पूर्व विभागाच्या सहाय्यक आयुक्त मृदुला अंडे, पी उत्तर विभागाचे सहायक आयुक्त कुंदन वळवी आणि पी दक्षिण विभागाचे सहायक आयुक्त अनिरूद्ध कुलकर्णी यांच्याशी दूरध्वनी संवाद साधला. या दूरध्वनी संवादादरम्यान त्यांनी संबंधित सहाय्यक आयुक्त यांना विविध बाबींच्या अनुषंगाने निर्देश दिले.

पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून मुंबई महानगरातील मोठ्या आणि लहान नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे वेगाने सुरु आहेत. कंत्राटदाराने काढलेला ओला गाळ ४८ तासानंतरच त्याचे वहन होत आहे की नाही, याकडेही संबंधित अभियंत्यांनी प्राधान्याने लक्ष केंद्रीत करावे. तसेच सहायक आयुक्तांनी संबंधित अभियंत्यांकडून या सर्व कामाचा दररोज आढावा घ्यावा, अशा सूचनाही डॉ. शर्मा यांनी पाहणीनंतर संबंधित सहाय्यक आयुक्तांना दिल्या आहेत. पी दक्षिण विभागातील दाजीवाडी भाजी मंडई, राणीसती मार्ग मंडी परिसरातील स्वच्छता कामांचाही त्यांनी आढावा घेतला. तसेच तिनही विभागातील उड्डाणपुलांखालील आणि परिसरातील कचरा हटवून परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रभावी कार्यवाही करावी, असे निर्देशही शर्मा यांनी दिले.




## अमली पदार्थांविरोधात जनजागृती कार्यक्रम

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्सतर्फे अमली पदार्थांविरोधात जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. वाढत्या अमली पदार्थांच्या गैरवापराच्या पार्श्वभूमीवर नशामुक्त भारत अभियान अंतर्गत नवी मुंबईमध्ये कार्यरत असलेले कार्यकर्ते दर्शन नाईक यांनी उरण परिसरातील परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत ही जनजागृती मोहीम आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला.

या संदर्भात त्यांनी अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्सचे डीवायएसपी रामचंद्र मोहिते यांच्याशी संपर्क साधून उरण येथे जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याची विनंती केली. त्यांच्या सकारात्मक प्रतिसादानंतर ANTF कडून एक विशेष पथक पाठविण्यात आले.

या पथकात पीएसआय सुहास तावडे, हेड कॉन्स्टेबल श्याम जगताप, जितेंद्र कांबळे व बाळू मगार यांचा समावेश होता. त्यांनी उरण एज्युकेशन सोसायटीच्या ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्याचे कायदेशीर परिणाम तसेच आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी दर्शन नाईक यांनी व्यसनाला एक आजार म्हणून संबोधत त्याबाबत सखोल माहिती दिली. तसेच व्यसनमुक्तीसाठी उपलब्ध असलेल्या मदतीविषयी, पुनर्वसन प्रक्रियेविषयी आणि योग्य मार्गदर्शन घेतल्यास व्यसनातून बाहेर पडणे शक्य असल्याचे विद्यार्थ्यांना पटवून दिले.

## तंत्रशिक्षण विद्यार्थ्यांसाठी जागतिक रोजगाराच्या संधी

**● राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि सीआयआय यांच्यात सामंजस्य करार**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांना विदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी संबंधित देशांची भाषा व संस्कृतीचे ज्ञान अत्यावश्यक असते. यासाठी जर्मनी, जपान आणि रशिया या देशांच्या भाषांचे प्रशिक्षण देण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. या भाषा प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कामकाज संस्कृतीशी जुळवून घेण्याची क्षमता, संवाद कौशल्ये आणि व्यावसायिक आत्मविश्वास वाढेल. परिणामी, परदेशातील रोजगाराच्या संधींमध्ये लक्षणीय वाढ होईल, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

आज मंत्रालयात महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि Confederation of Indian Industry यांच्यात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सामंजस्य करार करण्यात आला.

यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, जर्मनीसारख्या देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची मोठी मागणी आहे. राज्यातील पदविका विद्यार्थ्यांना तेथे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा करार करण्यात आला आहे. या सामंजस्य करारानुसार, त्यांच्या कौशल्य उत्कृष्टता केंद्रामार्फत 'महाराष्ट्र, जर्मनी, जपान कुशल कामगार गतिशीलता' या उपक्रमासाठी अंमलबजावणी व उद्योग समन्वय भागीदार म्हणून कार्य करणार आहे. या कराराचा मुख्य भर प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि कौशल्य समन्वयावर राहणार आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून या उपक्रमासाठी आवश्यक पायाभूत सुविधावर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि नेटवर्किंग सुविधाउपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच, धोरणात्मक देखरेख आणि प्रशिक्षण उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी समन्वय साधला जाणार आहे.

**महिलांविषयी संवेदनशील वार्तांकन करावे | विजया रहाटकर यांचे प्रतिपादन**

## 'महिला, माध्यमे आणि तंत्रज्ञान' कार्यशाळेचे उद्घाटन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

माध्यमे ही केवळ माहिती देण्याचे साधन नसून समाजाची विचारसरणी घडवणारी प्रभावी शक्ती आहेत. त्यामुळे महिलांशी संबंधित विषय हाताळताना विशेष संवेदनशीलता, जबाबदारी आणि अचूकता आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

राष्ट्रीय महिला आयोग आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित महिला, माध्यमे आणि तंत्रज्ञान या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी माहिती व जनसंपर्क विभागाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, सदस्य सचिव नंदिनी आवडे, वरिष्ठ पत्रकार स्वाती गुप्ता, लेखिका रिचा सूद आदी उपस्थित होते.

महिलांनी विज्ञान, तंत्रज्ञान, संरक्षण, प्रशासन आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली असली, तरी त्यांच्यासमोर अनेक आव्हाने कायम आहेत. या पार्श्वभूमीवर माध्यमांची भूमिका अधिक जबाबदारीची ठरते, असे रहाटकर यांनी नमूद केले.

डिजिटल युगात बातम्यांचा वेग प्रचंड वाढला असला, तरी पडताळणीशिवाय माहिती प्रसारित होण्याचा धोका वाढला आहे. बातमी लवकर देणे महत्त्वाचे असले तरी तिची विश्वासार्हता त्याहून अधिक महत्त्वाची आहे, असे त्या म्हणाल्या. फेक न्यूज आणि दिशाभूल रोखण्यासाठी तथ्य-तपासणीला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महिलांविरोधातील गुन्ह्यांचे वार्तांकन करताना सुयोग्य भाषेचा वापर करत पीडितेचा सन्मान आणि ओळख संरक्षण हे सर्वोच्च प्राधान्य असावे, असे आवाहन केले. तसेच, कोणत्याही परिस्थितीत पीडितेची ओळख उघड न करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. लिंग-संवेदनशील वृत्तांकन हा पर्याय नसून प्रत्येक पत्रकाराची व्यावसायिक जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. महिलांशी संबंधित कायद्यांची अचूक माहिती पत्रकारांना असणे गरजेचे असून त्यामुळे वृत्तांकन अधिक तथ्याधारित आणि कायदेशीरदृष्ट्या योग्य राहते, असेही त्या म्हणाल्या.

अलीकडच्या काळात माध्यम क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून येत असल्याचे नमूद करत त्यांनी पीडितेची ओळख प्रकट न करणे, महिला तज्ज्ञांना संधी देणे आणि पॉश कायदा तसेच महिला तस्करीसारख्या विषयांवर सातत्याने प्रकाश टाकणे या बाबींचे स्वागत केले. महिलांच्या यशकथा, संघर्ष आणि प्रेरणादायी प्रवास यांना अधिक प्रसिद्धी देण्याची गरज व्यक्त केली.

**प्रश्न धोरणात्मक दृष्टिकोनातून मांडावेत**

माध्यमांनी महिलांचे प्रश्न केवळ गुन्हेगारी घटनांपुरते मर्यादित न ठेवता सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक दृष्टिकोनातून मांडावेत, असे आवाहन त्यांनी केले. तसेच मीडिया ट्रायल टाळणे, न्यायप्रक्रियेचा सन्मान राखणे आणि वंचित व तळागाळातील महिलांच्या आवाजाला मुख्य प्रवाहात आणणे ही माध्यमांची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे रहाटकर यांनी सांगितले

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# मुंबई-गोवा महामार्गावरील सावली हरपली



(संग्रहीत छायाचित्र)

। माणगाव । प्रतिनिधी ।

गेल्या तब्बल १६ वर्षांपासून रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गाच्या कामामुळे केवळ विकासाचे स्वप्नच धुळीस मिळाले नाही, तर पर्यावरणाचाही मोठा बळी गेला आहे. या महामार्गालगत लावण्यात आलेली झाडे प्रचंड उष्णता, पाण्याअभावी आणि देखभालीच्या अभावामुळे करपून नष्ट झाली आहेत. परिणामी, कधी हिरवाईने नटलेला हा रस्ता आज ओसाड माळरानासारखा दिसू लागला आहे.

महामार्गाच्या रुंदीकरणासाठी शासकीय आकडेवारीनुसार सुमारे ६८ हजार जुन्या, विशाल वृक्षांची कत्तल करण्यात आली. मात्र, स्थानिकांच्या मते प्रत्यक्षात हा आकडा याहून अधिक असून हजारो झाडे निर्दयपणे नष्ट झाली. यामुळे प्रवाशांना मिळणारी हक्काची सावली अक्षरशः नाहीशी झाली आहे. काही किलोमीटरपर्यंत एकही झाड

- **हजारो झाडांची कत्तल**
- **हिरवाई ऐवजी ओसाडपणा**

दिसत नसल्याने उन्हाचा तीव्र तडाखा सहन करत प्रवास करावा लागत आहे.

चौपदरीकरण प्रकल्पांतर्गत दुतर्फा तब्बल एक कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट जाहीर करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ ९ ते १० हजार झाडांची लागवड झाल्याचे दिसून येते. ही बाब म्हणजे पर्यावरणीय बांधिलकीची उघडपणे केलेली फसवणूक असल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. मात्र, हा महामार्ग होण्यापूर्वीच टोल नाका उभारण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. पूर्वी या महामार्गालगत आंबा, जांभूळ, पळस, बहावा, पिंपळ, वड यांसारखी सावली देणारी, फळझाडांनी समृद्ध अशी झाडे होती. या झाडांमुळे प्रवास सुखद, थंडावा देणारा आणि निसर्गरम्य व्हायचा. मात्र, विकासाच्या नावाखाली ही सर्व हिरवाई कायमची नाहीशी झाली असून 'रस्ता' मिळाला, पण 'निसर्ग' हरवला, अशी खंत प्रवासी व्यक्त करत आहेत.

### पर्यावरणप्रेमींची नाराजी

हरवलेली हिरवाई परत मिळवण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर भविष्यात याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही पर्यावरणप्रेमी देत आहेत.

महामार्गाचे ९० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा लोकप्रतिनिधी करत असले, आणि जूनपर्यंत काम पूर्ण होईल अशी आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्ष परिस्थिती पाहता हा प्रकल्प पुढील वर्षीच पूर्ण होईल, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, या महामार्गावर मूलभूत सुविधांचाही अभाव प्रकर्षाने जाणवतो. शौचालयांची, पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब बनली असून, अपघाताच्या वेळी जखमींना साधे पाणीही उपलब्ध होत नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. डोंगर उत्खनन, जंगलांची तोड आणि झाडांची कमतरता यामुळे परिसरातील तापमान लक्षणीय वाढले आहे. सिमेंट-काँक्रीटच्या रस्त्यावरून परावर्तित होणारी उष्णता प्रवास अधिकच असह्य करत आहे. जर गेल्या १६ वर्षांत नियोजनबद्ध वृक्षलागवड झाली असती, तर आज हा महामार्ग पर्यावरणपूरक, सावलीदार आणि सुखद अनुभव देणारा ठरला असता. आता तरी प्रशासनाने जागे होऊन येत्या पावसाळ्यापूर्वी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करावी, तसेच त्यांची नियमित देखभाल सुनिश्चित करावी, अशी जोरदार मागणी कोकणातील नागरिक आणि प्रवासी करत आहेत.

# आदिवासी कार्यकर्त्यांच्या आत्मदहनाचा इशारा



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील माथेरानचे डोंगर रांगेत असलेल्या आदिवासी वाड्यांच्या रस्त्याला वन विभागाने परवानगी द्यावी या मागणीसाठी आदिवासी कार्यकर्त्यांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. मात्र, वन विभागाने ५ मे पर्यंत रस्त्यासाठी जागा देण्याची परवानगी देण्याचे लेखी आश्वासन दिले. परंतु ३० एप्रिल पूर्वी वन जमिनीमधून रस्ता करण्याची परवानगी दिली नाही तर शासनाला कोणत्याही सूचना न देता आत्मदहन आंदोलन केले जाईल असा इशारा आदिवासी कार्यकर्ते जैतू पारधी आणि गणेश पारधी यांनी दिला आहे.

कर्जत-कल्याण राज्य मार्ग ७६ ते जुम्मापट्टी हा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर आहे. हा रस्ता तीन ग्रामपंचायतीमधून जात असून रस्त्याच्या कामाला किरवलीपासून सुरुवात झालेली आहे. वन विभागाने या रस्त्यातील काही भागाला अद्याप परवानगी दिलेली नाही. माणगावतर्फे वरेडी ग्रामपंचायतीमधील रस्त्यासाठी वनविभागाकडून परवानगी देण्यात आलेली नाही. कायद्यात बसत असून सुद्धा वनविभाग कार्यालयाकडून जाणीवपूर्वक मंजुरी मिळत नसल्यामुळे आदिवासी समाज नाराज आहे. तालुक्यातील ग्रामपंचायत माणगांवतर्फे वरेडी ग्रामपंचायत हद्दीत जाणीपूर्वक वनविभागाकडून ३/२ चा दावा मंजूर केला नाही. कायद्यात बसुन सुध्दा वनविभाग कार्यालयाकडून जाणीपूर्वक मंजूरी मिळत नाही. त्यामुळे आदिवासी समाजाचे कार्यकर्ते गणेश पारधी आणि जैतू पारधी यांनी कर्जत वन विभाग कार्यालयाच्या बाहेर आत्मदहन आंदोलन जाहीर केले होते.

त्यावेळी आदिवासी कार्यकर्त्यांच्या आत्मदहन आंदोलनाची शक्यता लक्षात घेऊन कर्जत पोलिसांनी मोठा बंदोबस्त तेथे ठेवला होता. सहायक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यावेळी उपस्थित होते. तर आदिवासी समाजाचे जिल्ह अध्यक्ष मालू निरगुडे, दत्ता निरगुडे, सुनील पारधी, बाळू भगत, सुनील गोरे, चहू पारधी, बुधाजी निरगुडे आदी उपस्थित होते.

शेवटी लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आपले आत्मदहन आंदोलन ३० एप्रिल पर्यंत स्थगित करण्यात आले. या कालावधीत वन जमिनीतून रस्ता करण्याची परवानगी मिळाली नाही तर एक मे महाराष्ट्र दिनी शासनाला कोणतीही सूचना न देता आत्मदहन केले जाईल आणि आमचे मृतदेह वन विभागाच्या कार्यालयात पोहोचतील असा इशारा जैतू पारधी यांनी वन विभागाला दिला आहे.

# म्हसळ्यात कर्मचाऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन



। म्हसळा । प्रतिनिधी ।

राज्य सरकारी कर्मचारी संघटनाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्याकडे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारी (दि.२१) एप्रिलपासून म्हसळा तालुक्यात बेमुदत संप पुकारण्यात आला आहे.

संपाचा आजचा दुसरा दिवस आहे. यामध्ये राज्य सरकारी, निमसरकारी, जिल्हा परिषद, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, नगरपालिका आणि कंत्राटी कर्मचारी यामध्ये सहभागी आहेत. तहसीलदार कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून तहसीलदार सचिन खाडे यांच्याकडे मुख्यमंत्री यांना देण्यासाठी केलेले निवेदन तहसीलदार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

याप्रसंगी अव्वल कारकून सलीम शहा, सौ. लिमकर, उभारे, दिपक चव्हाण, सूर्यतळ आदी कर्मचारी उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशी एकूण ३३ कर्मचाऱ्यांपैकी अ श्रेणीचे १ आणि ब श्रेणीचे ३ असे ४ कर्मचारी उपस्थित होते. शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करून नागरिकांचे होणारे हाल थांबवावेत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# परशुराम जयंतीचे आयोजन



। कर्जत । प्रतिनिधी ।

शनी मंदिराच्या रवी किरण सभागृहात सर्वशाखीय ब्राम्हण सभेच्या वतीने परशुराम जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. परशुरामांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलनाने समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी उपाध्यक्ष संजीव दातार, विशाल जोशी, प्रज्ञा परांजपे, सायली जोशी उपस्थित होते.

याप्रसंगी विजय कुमार गोखले, सतीश मुसळे, डॉ. प्रशांत गांगल, प्रमोद करंदीकर, रंजना करंदीकर, चंद्रशेखर भडसावळे, अनुराधा भडासावळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्रीराम पुरोहित, पांडुरंग गरवारे, संतोष वैद्य, पराग दातार, अलका मुसळे, अविनाश वैद्य, प्राजक्ता गरवारे, रश्मी गांगल, मिताली करमरकर, पूजा गोखले, वैदेही पुरोहित, मधुस्मिता मावळणकर, अक्षय जोशी,अथर्व जोशी, केतन गडकरी आदी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांचा आंदोलनात सहभाग



। नेरळ । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी संघटनांच्या माध्यमातून आपल्या प्रलंबित मागण्यासाठी कामबंद आंदोलन राज्यभरात सुरू आहे. कर्जत तालुका कर्मचारी संघटनेने या आंदोलनात सहभाग घेतला असून कर्जत तालुक्यातील. सर्व सरकारी कर्मचारी यांनी कामबंद आंदोलनामध्ये सहभाग घेतला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या या कामबंद आंदोलनामुळे तालुक्यातील सर्व सरकारी कार्यालये ओस पडली आहेत.

सकाळपासूनच विविध विभागांतील कर्मचारी आंदोलनात सहभागी झाल्याने कार्यालयीन कामकाजावर तात्काळ परिणाम दिसून येत आहे. महसूल, पंचायत, शिक्षण, आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या विभागांतील सेवा विस्कळीत होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

तालुक्यात सुरू झालेल्या बेमुदत संपामुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त होत आहे. शासकीय कामकाज ठप्प झाल्यास दाखले, प्रमाणपत्रे, आरोग्य व महसूल संबंधित सेवा विलंबित होऊन सामान्यांना अडचणींचा सामना करावा लागेल असे अनेकांचे म्हणणे आहे. दरम्यान, या बेमुदत संपामुळे सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवांसाठी प्रतीक्षा करावी लागणार असून, प्रशासन-शासन यांच्यातील चर्चेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुरूडमध्ये संपामुळे नागरिकांचे हाल



। आगरदांडा । प्रतिनिधी ।

प्रलंबित मागण्यांसाठी मुरूड तहसीलदार कार्यालयातील सर्व कर्मचारी बेमुदत संपावर गेल्यामुळे येणाऱ्या नागरिकांचे व शालेय विद्यार्थ्यांची कोणतीच कामे होत नसल्याने तालुक्यांसह शहरातील नागरिकांनी नाराजी दर्शवली आहे. संपाचा दुसरा दिवस मुरूडपासून ३५ किलोमीटर अंतरावरुन ग्रामस्थ आपल्या शासकीय कामांकरिता तहसीलदार कार्यालयात सातबारा, उत्पन्न दाखला, जातीचे प्रमाणपत्र, फेरफार, दाखले, शैक्षणिक दाखले, विविध दाखले घेण्यासाठी येत असतात. परंतु सलग दुसऱ्या दिवशी संप असल्याने महसुली कामे बंद असल्याने नागरिकांचे हाल होऊ लागले ज्यामुळे नागरिकांना, शेतकऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. यामुळे दैनिक व्यवहारांवर परिणाम होऊ लागला आहे.

# साळविंडे ग्रामपंचायतीमध्ये वयोवृद्धाचा गौरव



। म्हसळा । प्रतिनिधी ।

ग्रामपंचायत साळविंडे कार्यालयात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५/२६ अंतर्गत नाविन्यपुर्ण उपक्रमांमध्ये वयोवृद्ध लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, अन्नधान्य शिधा, शर्ट व पॅन्ट देऊन गौरविण्यात आले. तसेच सुकन्या लाभार्थींना प्रमाणपत्र अन्नधान्य शिधा व ठराविक रक्कम लाभार्थींच्या नावे फिक्स डिपॉजिट ठेवून गौरविण्यात आले. तसेच निराधार लाभार्थ्यांना प्रमाणपत्र अन्नधान्य शिधा तसेच स्त्री लाभार्थींना ६ वारी, ९ वारी साडी व पुरुष लाभार्थींना शर्ट पॅन्ट देऊन गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रमास उद्देश पारदुले, जागृती सावंत व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी जी. टी. विरकूड, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच गाव वाडी वस्तीतील गाव अध्यक्ष, महिला अध्यक्ष व मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आपत्ती काळात आपदामित्रांचे सहकार्य महत्वाचे** | **नियंत्रण कक्ष कार्यान्वित ठेवण्याचे निर्देश**

# मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक



। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज तसेच अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. आपत्ती काळात सर्व यंत्रणानी सतर्क व दक्ष रहावे, तसेच मान्सून पूर्व तयारी करताना सर्व बाबींची काटेकोरपणे तपासणी आणि उपाययोजना करावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले. नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय मान्सून पूर्व तयारी आढावा बैठक २०२६ चे आयोजन करण्यात आले होते, यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.

पावसाळा सुरु होण्याकरिता एक महिन्याचा कालावधी बाकी असून सर्व शासकीय यंत्रणानी अतिधोकादायक व धोक्याची संभावना असलेल्या ठिकाणांची पाहणी करावी. या ठिकाणच्या नागरिकांना मान्सून कालावधीमध्ये सुरक्षित जागी स्थलांतरीत करता यावे यासाठी निवाऱ्याची सज्जता करावी. आपत्ती काळात आपदामित्रांचे सहकार्य खूप महत्वाचे असून ते तात्काळ मदतीला धावून येवून महत्वाची भूमिका बजावत असतात. याकरिता आपदा मित्र हे जिल्ह्याला लाभलेले एक वरदानच असल्यांचे सांगितले.

प्रत्येक विभागांनी आपला नियंत्रण कक्ष कार्यान्वित ठेवावा. याकरिता एक समन्वयक अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. जलसंपदा विभागाने आपल्या अखत्यारित असलेली धरणे, मध्यम प्रकल्पांची तपासणी करावी. आरोग्य विभागाने प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेशा औषधसाठा, व्हॅक्शीन उपलब्ध ठेवाव्यास सांगितले.

पाटबंधारे विभागाने धरणांची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अतिवृष्टी विचारात घेवून टप्प्या-टप्प्याने धरणांतून विसर्ग करावा अशा सूचनाही जावळे यांनी केल्या. जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, तसेच या काळात पूर्व परवानगी शिवाय कुणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश ही त्यांनी यावेळी दिले.दरड प्रवण गावांकरिता नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी गावातील लोकांच्या संपर्कात राहण्यास सांगितले.

सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक पूलांची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती तात्काळ करावी व पर्यायी मार्ग सुस्थितीत ठेवावेत. तसेच रस्त्यावरील खडे, साईडपट्टी भरुन घेणे, रस्त्यावरील ब्लिंकर्स, बोर्ड, डायव्हर्शनचे बोर्ड, ब्लॅक स्पॉटवर रिफ्लेक्टर्स बसवावेत. सर्व विभागांकडील शोध व बचाव साहित्यांची दुरुस्ती करून सर्व साहित्य सुस्थितीत राहील, याची दक्षता घेण्यास सांगितले.

बैठकीचे प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी केले. याप्रसंगी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, भारतीय तटरक्षक दलाचे अभिषेक कुमार, आपत्ती व्यवस्थापन अधिकार सागर पाठक, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यासह एन डी आर एफ, होमगार्डा, महावितरण, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक परिवहन अधिकारी, यासह विविध शासकीय विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## निवडक



### वळवलीत रस्त्याच्या डांबरीकरणास सुरुवात

**पनवेल ग्रामीण :** पालिका हद्दीतील वळवली गाव परिसरातील मुख्य रस्त्याची अत्यंत खराब झालेली अवस्था लक्षात घेता स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात येत होत्या. या पार्श्वभूमीवर शेकाप नगरसेवक प्रकाश म्हात्रे यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून वळवली मुख्य रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे वाहनचालकांना तसेच पादचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात तर रस्त्यावर खड्डे आणि पाणी साचल्याने परिस्थिती अधिकच बिकट होत होती. त्यामुळे या रस्त्याचे तातडीने नूतनीकरण करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत होती. नगरसेवक प्रकाश म्हात्रे यांनी या मागणीची दखल घेत संबंधित विभागाशी सातत्याने पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला. अखेर या कामाला सुरुवात झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नागरिकांनी नगरसेवकांचे आभार व्यक्त करत काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.




### नांदगाव विद्यालयात स्वच्छतागृहाचे उद्घाटन

**पाली/गोमाशी :** संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे सायक्स अॅण्ड रे इक्वीटीज (इं) लिमिटेड, नारायणा हेल्थ ग्रुप आणि द रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वरळी यांचे सौजन्याने सुसज्ज स्वच्छता गृह बांधण्यात आले आहे. या स्वच्छतागृहाचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांच्या हस्ते बुधवारी (दि.२२) रोजी करण्यात आले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना खैरे म्हणाले की, शैक्षणिक साहित्य, पोषक आहार, भौतिक सुविधा उपलब्ध केल्याबद्दल या ग्रुपचे मनापासून आभार. तसेच या ग्रुपने जे स्वच्छतागृह दिले त्याची स्वच्छता तसेच पाण्याचा योग्य वापर करून ते स्वच्छ कसे राहतील याची काळजी प्रत्येक विद्यार्थ्यांनी घेतली पाहिजे. त्यामुळे आपले आरोग्य निरोगी आणि सुदृढ राहण्यास मदत होईल असे त्यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे, प्राचार्य बबन पालवे, सामाजिक कार्यकर्ते रोशन बारस्कर, संजय भिलारे, सुधीर सावंत, सुधीर साखरले, अशोक शिंदे,आकाश ठाकूर, नागेश सायगावकर, जयश्री अहिरराव, विद्या भिसे आदी मान्यवर उपस्थित होते.

### श्रीवर्धन पोलिसांची चोरट्यांवर नजर

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन शहरात गेल्या महिन्यात विठ्ठल आळी व पोद्दार चाळीत चोरट्यांनी दरवाजांचा कडी कोयंडा तोडीत हात साफ केला होता.दोन ठिकाणी चोऱ्या झाल्यानंतर नागरिकांना सायंकाळी व रात्री चोरटे फिरत असल्याचे दिसून आल्याने नागरिकांनी आपापल्या परिसरात रात्रीची गस्त घालण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांनी रात्री अपरात्री चोरट्यांचा पाठलाग केला असता ते डोंगरावर पळून जात असल्याचे सांगितले होते. श्रीवर्धन पोलीस व नागरिकांच्या चर्चेवेळी, चोरांचे वास्तव्य अथवा चोरटे सायंकाळ दरम्यान डोंगर मार्गाने खाली उतरत असल्याचा अंदाज काढण्यात आला होता. श्रीवर्धन पोलीसांकडून आता सायंकाळ, रात्रीच्या वेळी ड्रोन कॅमेऱ्याद्वारे डोंगरावर निगराणी ठेवण्यास सुरुवात झाली आहे.जीवनाबंदर डोंगर पट्टयात काही संशयास्पद हालचाली आढळल्या नसल्याचे श्रीवर्धन पोलिसांकडून सांगण्यात आले. नागरिकांनी आता अफवांवर विश्वास ठेवू नये. संशय आल्यास पोलीसांना कळवा, संशयित व्यक्ती डोंगर पट्टयात पळून गेली असल्यास ड्रोनने पाहणी करता येईल, असे पोलीसांकडून सांगण्यात आले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **झिराड आणि मांडवा येथील** दुकानात पीकअप आशयर व ४०७ वर ड्रायवर हवे आहेत. संपर्क - ८००७८९३२३२
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **बोअरवेल/विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे** भूजल संशोधन व केमिकल ट्रीटमेंट द्वारा जुन्या बोअरवेलचे पाणी वाढवणे. ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **1 BHK ब्लॉक भाड्याने उपलब्ध.** सेंट मेरी स्कूलसमोर चेंढरे-अलिबाग, मो. ७६६६१२६८४४, ८४२११६३२५५
- **नागाव ४, सहाण ३ गुंठे** कमर्शियल बांधकाम केलेली भाडेतत्वावर देणे आहे. मो. ९३२४०६६१११
- **नागाव येथे राहून कामासाठी कपलची आवश्यकता** कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम करणे, तसेच गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल करणे. सुविधा : राहण्यासाठी स्वतंत्र केअरटेकर रूम उपलब्ध. पगार : रू. २५,०००/- प्रति महिना संपर्क : ७५५९१८४६१२
- **३५ गुंठे शेतजमीन विकणे आहे.** मौजे कावीर- गरूडपाडा, बोअरवेल आणि इलेक्ट्रिक मीटर आहे. आतील रस्त्याला लागून. संपर्क : ९८६७५३०७२७
- **अलिबाग येथील होलसेल किराणा दुकानात** ऑफिस कामाकरीता योग्य कर्मचारी हवे आहेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. शिक्षण : १०, १२ आवश्यक. ९४२२६९१११४७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# राजीव गांधी मैदानाचा 'अभिषेक'

## ।। सनरायझर्स हैदराबादचा विजयी चौकार ।। गुणतालिकेत पहिल्या चारमध्ये स्थान

**। हैद्राबाद । वृत्तसंस्था ।**

आयपीएलचा आता पहिला टप्पा संपत आला असून आता संघांमध्ये पहिल्या चारमध्ये स्थान मिळवण्यासाठी चुरस दिसून येत आहे. नुकतेच सनरायझर्स हैदराबादने राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर मंगळवारी (दि.२१) दिल्ली कॅपिटल्सला ४७ धावांनी पराभूत करत मोठी झेप घेतली आहे. अडखळत सुरुवात झालेल्या हैदराबादने आता चांगली लय पकडली आहे. त्यामुळे त्यांनी आता गुणतालिकेतही पहिल्या चारमध्ये स्थान मिळवण्यात यश मिळवले आहे. हा सामना अभिषेक शर्माने शतक करत गाजवला. त्यामुळे त्याने देखील आता ऑरेंज कॅपच्या शर्यतीत गरुडझेप घेतली आहे.

या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून सनरायझर्स हैदराबादला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले. मात्र, सलामीला आलेल्या अभिषेक शर्माने सुरुवातीपासून शेवटपर्यंत फटकेबाजी केली. त्याने ट्रॅव्हिस हेड (३७), इशान किशन (२५) आणि हेनरिक क्लासेन (नाबाद ३७) यांच्यासोबत भागीदाऱ्या करत आयपीएलमधील दुसरे, तर टी-२० कारकिर्दीतील ९वे शतक पूर्ण केले. त्याने ६८ चेंडूत १० चौकार आणि १० षटकारांसह नाबाद १३५ धावा केल्या. त्यामुळे हैदराबादने २० षटकांत २ बाद २४२ धावा केल्या. त्यानंतर २४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीसाठी पाथुम निसंका आणि केएल राहुल यांनी डावाची सुरुवात केली. परंतु, तिसऱ्या षटकात निसंकाला दिलशान मदुशंकाने ८ धावांवर बाद केले. मात्र, त्यानंतर केएल राहुलसह नितीश राणाने चांगली फलंदाजी केली. या दोघांमध्ये ८६ धावांची भागीदारीही झाली. परंतु, १०व्या षटकात केएल राहुलचा अडथळा साकिब हुसैनने दूर केला. त्याने केएल राहुलला ३७ धावांवर झेलबाद केले. त्याच्यापुढचे इशान मलिंगाने टाकलेले ११वे षटक दिल्लीला सर्वात मोठा धक्का देणारे ठरले. या षटकात पहिल्याच चेंडूवर त्याने नितीश राणाला ५७ धावांवर झेलबाद केले. त्याच्या पुढच्याच चेंडूवर इशानने डेव्हिड मिलरला शून्यावर त्रिफळाचीत केले. त्यानंतर ट्रिस्टन स्टब्स आणि समीर रिझवी यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यात ५९ धावांची भागीदारी झाली. परंतु, ही भागीदारीही १६व्या षटकात मलिंगानेच तोडली. त्याने स्टब्सला २७ धावांवर बाद केले. १८व्या षटकात आशुतोष शर्मालाही १४ धावांवर मलिंगानेच बाद केले. त्यानंतर २०व्या षटकात हर्ष दुबेने अक्षर पेटल (२), समीर रिझवी (४१) आणि लुंगी एनगिडी (०) यांना बाद केले. हैदराबादकडून इशान मलिंगाने सर्वाधिक ४ बळी घेतले. तर, हर्ष दुबेने ३ बळी घेतले. तसेच, दिलशान मदुशंका आणि साकिब हुसैन यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.






### अभिषेक शर्माची 'ऑरेंज' झेप

या सामन्यापूर्वी अभिषेकच्या आयपीएल २०२६ स्पर्धेत ६ सामन्यात २ अर्धशतकांसह १८८ धावा होत्या. तो आयपीएल २०२६ मध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये १७ व्या क्रमांकावर होता. मात्र, दिल्लीविरुद्ध केलेल्या नाबाद १३५ धावांच्या खेळीमुळे त्याने थेट अव्वल क्रमांकावर उडी घेतली आहे. त्याचे आता ७ सामन्यांत ५३.८३ सरासरीने ३२३ धावा झाल्या आहेत. त्यामुळे आता त्याच्याकडे सध्या ऑरेंज कॅप आहे. त्याने त्याचा संघसहकारी हेनरिक क्लासेनला मागे टाकले आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेत आत्तापर्यंत केवळ अभिषेक शर्मा आणि हेनरिक क्लासेन यांनीच ३०० धावांचा टप्पा ओलांडला आहे. क्लासेन या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने ७ सामन्यांत ३२० धावा केल्य आहेत. या दोघांच्या पाठोपाठ तिसऱ्या क्रमांकावर शुभमन गिल असून त्याने ५ सामन्यांत २६५ धावा केल्या आहेत.

## निवडक

### मुंबई इंडियन्सची ताकद वाढली

**मुंबई** : इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेत बहुप्रतिक्षित मुंबई इंडियन्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्स सामना गुरुवारी (दि.२३) खेळवला जाणार आहे. हा सामना मुंबईच्या घरच्या मैदानात वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. दोन्ही संघांची सध्या सारखीच परिस्थिती आहे, त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा सामना महत्त्वाचा आहे. मुंबई आणि चेन्नई यांनी आत्तापर्यंत ६ सामन्यांत २ सामने जिंकले आहेत, तर ४ सामने पराभूत झाले आहेत. मुंबई ७व्या, तर चेन्नई ८ व्या क्रमांकावर आहे. अशात चेन्नईला खेळाडूंच्या दुखापतींचे धक्के बसले आहेत. खलील अहमदपाठोपाठ आता आयुष म्हात्रे देखील स्पर्धेतून बाहेर झाला आहे. परंतु, दुसरीकडे आता मुंबई इंडियन्सची ताकद मात्र वाढली आहे. त्यांच्या संघात मॅच विनर खेळाडू नुकताच दाखल झाला आहे. इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू विल जॅक्स चेन्नईविरुद्धच्या सामन्यापूर्वी मुंबई संघात दाखल झाला आहे. तो संघात आल्याने मुंबईच्या फलंदाजी आणि गोलंदाजीलाही मजबुती मिळणार आहे. तो कोणत्याही क्रमांकावर फलंदाजी करू शकतो, तसेच त्याच्याकडे स्फोटक फलंदाजी करण्याची क्षमता आहे.



### किक बॉक्सिंगला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पनवेल** : सिटी किकबॉक्सिंग असो.च्यावतीने 'पनवेल सिटी किकबॉक्सिंग चषक' ही राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा सेंट अँड्र्यूज इंटरनॅशनल स्कूल येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध तालुक्यांतील स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या प्रतिष्ठित स्पर्धेमध्ये म.ए.सो. क्रीडावर्धिनी कळंबोली येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले. त्यात ओम कोठावळे (इ.६वी) याने सुवर्णपदक पटकावले. तर, अनुष्का गोरड (इ.५वी), श्री वीरकर (इ.४थी), कर्तव्य धनगर (इ.४थी) व स्वरा कालेल (इ.३री) यांनी रौप्यपदकाची कमाई केली. या सर्व खेळाडूंची राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

### रोनाल्डो बापबेटा एकत्र खेळणार?




**नवी दिल्ली** : पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोने चाळीशीतही त्याचा कमालीचा फिटनेस ठेवला असून तो अद्यापही फुटबॉलमध्ये सक्रिय आहे. आता तो त्याचा १५ वर्षीय मुलगा ख्रिस्तियानो रोनाल्डो ज्युनियरसोबतही खेळताना दिसण्याची शक्यता आहे. रोनाल्डो अद्यापही त्याच्या १००० गोलच्या दिशेने वाटचाल करत आहेत. याचदरम्यान, अल नासरसाठी रोनाल्डो आणि त्याचा मुलगा एकत्र खेळण्याचा चर्चांना उधाण आले आहे. सौदीमधील वृत्तानुसारा रोनाल्डोच्या मुलाला संघाच्या पहिल्या सेशनमध्ये सामील करण्याचा अल नासर विचार करत आहे. या वृत्ताने रोनाल्डोच्या चाहत्यांमध्ये मात्र उत्साहाचे वातावरण आहे. अनेक चाहते रोनाल्डो आणि त्याच्या मुलाला एकत्र खेळताना पाहण्यास उत्सुक आहेत. तथापि, अल नासर कोणताही निर्णय घाईत घेणार नाहीत. मुख्य संघात रोनाल्डो ज्युनियरचा सर्वाविेश इतर अनेक गोष्टींवरही अवलंबून आहे. तो या उच्च स्तरावर खेळण्यासाठी सज्ज आहे का, हे पाहिल्यानंतर खात्री झाल्यावरच अल नासर त्याचा विचार करण्याची शक्यता आहे.

### 'तिलकच्या अलौकिक प्रतिभेवर विश्वास'

**मुंबई** : तिलक वर्मामधील अलौकिक प्रतिभेवर आम्हाला नेहमीच विश्वास होता. मात्र, त्याने आपल्या क्षमतेप्रमाणे खेळ दाखवणे गरजेचे होते आणि तो त्यात यशस्वी ठरल्याचा आनंद असल्याचे वक्तव्य मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याने केले आहे. इंडियन प्रीमियर लीगमध्ये सलग चार पराभवानंतर अखेर विजयाच्या मार्गावर परतलेल्या मुंबईसाठी तिलकने निर्णायक शतकी खेळी केली. त्याच्या खेळीच्या जोरावर मुंबईने गुजरात टायटन्सचा ९९ धावांनी पराभव करत आपली निव्वळ धावगतीही सुधारली. मुंबईच्या संघाला अहमदाबाद येथे गुजरात टायटन्सकडून यापूर्वी सलग चार पराभव पत्करावे लागले होते. सोमवारी झालेल्या सामन्यातही मुंबईची सुरुवात अडखळती झाली होती. मात्र, अवघड खेळपट्टीवर तिलकने ४५ चेंडूंत नाबाद १०१ धावांची शानदार खेळी करत मुंबईला भक्कम धावसंख्या उभारून दिली. तिलकने सुरुवातीच्या २२ चेंडूंत अवघ्या १९ धावा केल्या होत्या. परंतु, दुसऱ्या 'स्ट्रॅटेजिक टाइम-आऊट'मध्ये कर्णधार हार्दिकने त्याला अधिक मोकळेपणाने खेळण्याची सूचना केली. त्यानंतर त्याच्या फलंदाजीत आमूलाग्र बदल दिसला. तिलककडे असलेली गुणवत्ता पाहता त्याने कोणतीही चिंता करू नये, असे मी त्याला सांगितले. फक्त चेंडू बघ आणि फटका मार, एवढाच मी त्याला संदेश दिला. तिलकने आज जे केले ते, त्याच्यासाठी, संघासाठी आणि मुंबई इंडियन्स फ्रँचायझीसाठी महत्त्वाचे होते, असे हार्दिक पाड्यांने सामन्यानंतर सांगितले.

# वेस्ट इंडिजचा खतरनाक बाऊंसर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिजचे जलदगती गोलंदाज खतरनाक बाऊन्सरसाठी पूर्वी ओळखले जायचे आणि त्यामुळे त्यांचा सामना करताना फलंदाजांच्या मनात भीती असायची. परंतु, आता ती भीती निघून गेली आहे. मात्र, नुकताच एका सामन्यात वेस्ट इंडिजचा गोलंदाज जयडेन सील्सच्या अनपेक्षित बाऊन्सरमुळे फलंदाज चक्क खाली कोसळला.

वेस्ट इंडिज चॅम्पियनशिप २०२६ या देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेत एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक घटना घडली आहे.त्रिनिदाद अँड टोबॅगोचा वेगवान गोलंदाज जयडेन सील्सने टाकलेला एक बाउन्सर खेळपट्टीवरून अनपेक्षितपणे उसळला. फलंदाज जेरेमिया लुईस याला चेंडूचा अंदाज येण्यापूर्वीच तो थेट त्याच्या हेल्मेटवर जाऊन आदळला. चेंडूचा वेग आणि उसळी इतकी भयानक होती की लुईस तात्काळ मैदानावर कोसळला. सुदैवाने त्याला गंभीर दुखापत झाली नाही; परंतु, या प्रकारामुळे तो इतका संतापला की त्याने आपले हेल्मेट रागाने लाथेने उडवून दिले. या घटनेनंतर पंच आणि वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी खेळपट्टीची पाहणी केली. खेळपट्टीवरून चेंडू कोठून आणि किती उसळेल याचा कोणताही अंदाज येत नव्हता, असे पाहणीत दिसून आले. अशा परिस्थितीत फलंदाजांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, असे लक्षात आल्यावर सामना थांबवण्यात आला.

# जय भवानी संघाची झळाळती कामगिरी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामीण गुणवत्तेला वाव देण्यासाठी धारवली कुणबी विकास मंडळाच्यावतीने नालासोपारा येथील फनफिस्ट मैदानावर क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जय भवानी क्रिकेट संघाने झळाळती कामगिरी करत अजिंक्यपद पटकावले आहे.

स्पर्धेचे उद्‌घाटन शिवसेना शाखाप्रमुख विवेक पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेत कम्पल्सरी चेसच्या नियमामुळे प्रत्येक चेंडूवर धाकधूक वाढली होती. अंतिम सामन्यात मात्र जय भवानी संघाने अष्टपैलू कामगिरीचे प्रदर्शन घडवले. अचूक गोलंदाजी आणि आक्रमक फलंदाजीच्या जोरावर त्यांनी विजयश्री खेचून आणली. विजेत्या जय भवानी संघाला १५ हजार रुपये व आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले. द्वितीय क्रमांकाला ७ हजार रुपये व चषक, तर तृतीय क्रमांकाला ३ हजार रुपये व चषक देण्यात आला. यासोबतच स्पर्धेतील मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज आणि गोलंदाज यांनाही मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.



स्पर्धेतील अंतिम सामन्याच्या निकालानंतर बक्षीस वितरण समारंभाला राष्ट्रवादी काँग्रेसचे श्रीवर्धन तालुक्यातील नेते सुजित तांदळेकर यांनी विशेष उपस्थिती लावली. यावेळी तांदळेकर यांनी, विजेत्यांना शुभेच्छा देतानाच खेळाडूंना प्रोत्साहन दिले. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळते. खेळातील जिद्द आणि संघभावना तरुणांच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन देखील त्यांनी यावेळी केले. या स्पर्धेचे शिस्तबद्ध नियोजन करण्यासाठी अमित, बंटी, हितेश, प्रतीक, विजय, नैनेश आणि विशाल यांसह धारवली कुणबी विकास मंडळाच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. पारदर्शक पंचगिरी आणि शांततेत पार पडलेल्या या स्पर्धेचे क्रीडाप्रेमींनी भरभरून कौतुक केले.

### मुरूडमध्ये शरीरसौष्ठव स्पर्धा उत्साहात

# असीम मुल्ला ठरला 'मुरूड श्री'

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड ऐके फिटनेस व श्री मेन फिजिक तर्फे 'मुरूड श्री'चे आयोजन करण्यात आले होते. बजरंगी व्यायाम शाळाचे संस्थापक आशीष खोत यांनी मुरूड समुद्रकिनाऱ्याजवळ ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेकरिता मुरूडसह श्रीवर्धन, म्हसळा व रोहा या ठिकाणाच्या ४० स्पर्धेकांनी भाग घेतला होता. असीम मुल्ला यांनी 'मुरूड श्री' हा किताब पटकावला.

या स्पर्धेची सुरुवात मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी बजरंगी व्यायाम शाळाचे संस्थापक आशीष खोत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, नगरसेवक रुपेश पाटील, आदेश दांडेकर, आशिल हेदुळकर, रोहा येथील राष्ट्रीय पंच परशुराम चव्हाण, शाम धाटावकर, अलिबाग येथील राष्ट्रीय पंच किरण भगत, मुरूड येथील राष्ट्रीय पंच राजेश गुप्ते, गजानन पाके, माजी राष्ट्रीय पंच मोहन करंदेकर, बाबु ठाकुर आदिंसह चार तालुक्यातील हाजोरो तरुण वर्ग उपस्थित होते. यावेळी मेन फिजिक भारत श्री सुर्वणपदक विजेता बॉबी पाटील यांनी शो पोजिंग देऊन तरूण वर्गाना उत्साहित केले. या शरीरसौष्ठव स्पर्धेत ऐके फिटनेस या व्यायाम शाळेचा विद्यार्थी असीम मुल्ला यांनी 'मुरूड श्री' हा प्रतिष्ठेचा किताब पटकावला. त्याला १५ हजार रुपये रोख रक्कम व चषक देण्यात आले. तर, द्वितीय क्रमांक नांदगाव येथील अजय दिवकर यांनी पटकाविला असून त्यांना ५ हजार रुपये रोख रक्कम व चषक देण्यात आले. तर, मेन फिजीकचा कैफ कारभारी हा विजेता ठरला आहे. तर, द्वितीय क्रमांक सुर्या गाणार व तृतीय क्रमांक अदित्य किल्लेकर यांनी पटकावला आहे. तसेच, बेस्ट पोझर शुंभम आंबुकर व उगवता तारा म्हणून सुर्या गाणार यांना गौरविण्यात आले.



● (छायाचित्रः गणेश चोडणेकर)

# उधारीवर खेळाडू घ्याः आश्विन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

आयपीएलचा पहिला टप्पा आता संपत आला आहे. अशातच चेन्नई सुपर किंग्सला खेळाडूंच्या दुखापतीचा धक्का बसला आहे. चेन्नईचा वेगवान गोलंदाज खलील अहमदनंतर आता आयुष म्हात्रे देखील आयपीएलमधून बाहेर झाला आहे. चेन्नईने अद्याप या दोघांचेही बदली खेळाडूंची घोषणा केलेली नाही. अशाच चेन्नईचा माजी क्रिकेटपटू आर अश्विनने संघाचे नाव न घेता खेळाडू उधार घेण्याचा मार्ग सुचवला आहे. अश्विनने पोस्ट केली आहे की, अनेक दुखापतींचा धक्का बसलाय. लोन विंडो ७ व्या सामन्यानंतर संपेल आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून प्रतिभावान खेळाडूंना लोनवर घेण्याची चांगली संधी आहे. तो अजूनही एकही सामना खेळलेला नाही, त्यामुळे चांगला पर्याय आहे. जर विहानला घेणे जमले नाही, तर अभिज्ञान कुंडू, डावखुरा खेळाडू म्हणून एक चांगला पर्याय आहे, ज्याचा भविष्याचा विचार करून घडवू शकतो. त्यावर एका युजरने त्याला एखादा संघ प्रतिस्पर्धी संघाला असा उधारीवर खेळाडू का देईल? त्यावर अश्विनने म्हटले की, एक संघ सध्या सुस्थितीत आहे, तर सध्याच्या घडीला दुसरा संघ त्यांच्याशी स्पर्धा करतच नाहीये, त्यामुळे पैसे कमावण्याची संधी असून त्या खेळाडूलाही खेळण्याची संधी मिळेल, असे त्यांनी प्रतिउत्तर दिले.



### आमदार चषक कबड्डी स्पर्धा उत्साहात | चार संघांची उपांत्य फेरीत धडक

# कबड्डीप्रेमींना थरारक सामन्यांची मेजवानी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**विक्रोळी पूर्वेला टागोर नगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आ. सुनील राऊत यांच्या पुढाकाराने आमदार चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत तिसऱ्या दिवशी कबड्डीप्रेमींना थरारक सामन्यांची मेजवानी चाखता आला आली. मुंबईच्या मुंबई बंदर, भारत पेट्रोलियम आणि आयएसपीएलसह ठाणे महानगरपालिका या संघांनी थरारक विजयासह व्यावसायिक गटाची उपांत्य फेरी गाठली. महिला गटातही मुंबईच्या शिवशक्ती, पुण्याच्या राजमाता जिजाऊ, पतंगराव कदम संघ आणि नंदुरबारच्या धर्मवीर कबड्डी संघाने उपांत्य फेरीत धडक मारली.**



उपांत्य फेरीत धडक मारण्यासाठी झालेल्या उपांत्य पूर्व लढतीत मुंबई बंदरने मध्यंतराला खोलवर चढायांनी संत सोपान काका बँकेविरुद्ध २०-१३ अशी आघाडी मिळवून दिली. मात्र, मध्यंतरानंतर संत सोपान काका संघाने वेगवान खेळ करत सामन्यात प्राण ओतले. शेवटची ५ मिनीटे असताना बरोबरीत असलेला खेळ शेवटी मुंबई बंदरने ३६-३२ असा जिंकत उपांत्य फेरीत स्थान मिळवले. ठाणे आणि मिरा-भायंदर महानगरपालिका यांच्यात पहिल्या मिनीटापासून संघर्षाची ठिणगी पडली. त्यामुळे पहिल्या सत्रात १४-१४ असा बरोबरीचा खेळ रंगला. मध्यंतरानंतर दोन्ही संघाच्या चढाईबहाद्दरांनी आघाडी घेण्यासाठी जोरदार खेळ केला. परंतु, गुण समान रेषेतच धावत होता. अखेर शेवटच्या क्षणी ठाण्याने मीरा भायंदरला २८-२५ असे मागे टाकत उपांत्यपूर्व फेरीचा अडथळा दूर केला. पिछाडीनंतर बीपीसीएलच्या भन्नाट चढायांनी सीजीएसटीला बीपीसीएलविरुद्धच्या उपांत्यपूर्व लढतीत मध्यंतराला २०-१० अशी अफलातून आघाडी मिळवून दिली होती. मात्र, मध्यंतरानंतर बीपीसीएल संघाने पहिल्या १० मिनीटांत आधी पिछाडी भरून सामन्यात पुनरागमन केले. त्यांनतर सीजीएसटीविरुद्ध एकेका गुणाची कमाई करत आघाडी घेतली. शेवटची ५ मिनीटे शिल्लक असताना बीपीसीएलने ३३-२७ अशी आघाडी कमावली होती. त्यानंतर बुद्धिचार्तुयाचा वापर करत आपली आघाडी टिकवली आणि सीजीएसटीविरुद्धचा संघर्ष ३५-३० असा जिंकली. आयएसपीएलने मुंबई पोस्टलचे आव्हान ४६-३४ असे सहज मोडीत काढत अंतिम चार संघात स्थान मिळवले.

महिलांच्या उपांत्यपूर्व फेरींच्या सामन्यात पतंगराव कदम आणि स्वराज्य स्पोर्ट्स क्लब यांच्यात झालेल्या सामन्यात तुल्यबळ लढत झाली. मध्यंतराला १६-१६ असा खेळ बरोबरीत थांबला. मध्यंतरानंतरही गुणफलक समान रेषेतच धावत होता. अखेर पतंगराव कदम संघाने ३३-३१ अशी दोन गुणांनी बाजी मारली. धर्मवीर आणि श्रीराम कबड्डी संघ यांच्यातला थरारही ३५-३३ असा संपला. राजमाता जिजाऊ आणि विवेक स्पोर्ट्स यांच्यातही काँटे की टक्कर झाली. राजमाता जिजाऊ २४-१४ अशी आघाडीवर होती. परंतु, उत्तरार्धात बरोबरीत चाललेला हा थरार विवेकने अवघ्या ३८-४० अशा फरकाने गमावला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)